रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २३ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)




# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २९ जून २०२४

किंमत ४ ₹




**कोण होणार विश्वविजेता?**

**भारत-दक्षिण आफ्रिका आज अंतिम लढत**

## गदारोळानंतर लोकसभा तहकूब

**नवी दिल्ली :** मोदी सरकारच्या कार्यकाळातील लोकसभेच्या संसद अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी (दि.२८ जून) विरोधकांकडून नीत पेपरफुटी प्रकरणाच्या चर्चेची मागणी करण्यात आली. यावेळी विरोधी पक्षाने संसद सभागृहात प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे लोकसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. दरम्यान, विरोधकांनी सभागृहात नीट पेपरफुटी प्रकरणावरून गदारोळ केला. त्यामुळे अध्यक्ष बिर्ला यांनी लोकसभा तहकूब केली. पुन्हा सोमवार, दि. १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पुन्हा लोकसभेचे कामकाज सुरू होईल, असे स्पष्ट अध्यक्ष बिर्ला यांनी सांगितले.

# निवडणुकांचा 'अर्थ' कर्जाचा 'संकल्प'



दिलीप जाधव

| मुंबई | लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव आणि आगामी विधानसभा निवडणुकीसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी (दि. २८) राज्याचा २०२४-२५चा शेवटचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी राज्यातील सर्वच घटकांना खुश करण्यासाठी घोषणांची अक्षरशः अतिवृष्टी केल्याचे दिसून आले. पण, घोषणा केल्या तरी त्याची पूर्तता करण्याची राज्याची आर्थिक परिस्थिती आहे का? या घोषणांची पूर्तता करण्यासाठी राज्य सरकार कुठून पैसे उभे करणार? याबाबत कुठेही वाच्यता नाही. सरकारने २० हजार ५१ कोटी रुपयांच्या तुटीचा अतिरिक्त अर्थसंकल्प मांडला. राज्यावर आठ लाख कोटींचा कर्जाचा बोजा असल्याचे आर्थिक पाहणी अहवालातून स्पष्ट झाले आहे. असे असताना घोषणांची महाथापेमारी कशासाठी? असा सवाल केला जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा असून, राज्याच्या विकासाचा गजर अर्थसंकल्पातून होईल, असा दावा केला आहे. तर, अडीच वर्षे तिजोरी साफ करून झाल्यावर सरकारी तिजोरीवर महायुती सरकारने शेवटचा हात मारून तिजोरीत खडखडात केला आहे. स्वतःचे खोके भरून झाल्यावर जनतेसाठी काहीतरी केल्याचा केविलवाणा प्रयत्न या अर्थसंकल्पात केल्याची टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

पान २ वर



### योजनांसाठी पैसे कुठून आणणार?

योजनांची पूर्तता करण्यासाठी राज्यसरकारला अधिकचं कर्ज घ्यावं लागेल, असं बोललं जात आहे. शुक्रवारी अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात २० हजार ५१ हजार कोटींची महसूली तूट आहे. जर अजून कर्ज काढलं, तर राज्यावरचा आर्थिक भार वाढू शकतो का? या घोषणांची पूर्तता कुठून करणार? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.



### माझी लाडकी बहीण योजना

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' २१ ते ६० वर्ष वयोगटातील पात्र महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. यासाठी दरवर्षी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. ज्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाखांपेक्षा कमी आहे, त्या कुटुंबातील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.




### वारकऱ्यांना मदत

निर्मल वारीसाठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी दिला जाईल. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येईल. या वर्षीपासून प्रति दिंडी २० हजार रुपये निधी देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय मंडळ स्थापन करण्यात येणार आहे.

**लखपती दीदी**
25 लाख महिलांचे उद्दिष्ट

**गाव तेथे गोदाम**
100 नवीन गोदामांसाठी
341 कोटींची तरतूद

**पिंक ई रिक्षा**
रिक्षा खरेदीसाठी 80 कोटी



- **अर्थमंत्र्यांकडून २० हजार ५१ कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प**
- **निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घोषणांची अतिवृष्टी**

> मी दहाव्यांदा आज अर्थसंकल्प सादर केला आहे. अनेक वर्षे राज्यकारभार पाहात असल्यामुळे काही निर्णय घेतल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीसाठी तेवढी क्षमता आपल्या राज्यात आहे का? तेवढा निधी आहे का? केंद्रानं राज्यांना घालून दिलेल्या नियमात गोष्टी बसतायत का? याचा विचार करून मी हा अर्थसंकल्प सादर केला आहे.
> – अजित पवार, अर्थमंत्री

धनगर समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी खारघर, नवी मुंबई येथे ४ हजार चौरस मीटरचा भूखंड.

> राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. एक लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्वल करणारा आहे. महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा अर्थसंकल्प असून, हा राज्याच्या विकासाचा गजर करणारा अर्थसंकल्प आहे.
> – एकनाथ शिंदे, एकनाथ शिंदे

> आजचा अर्थसंकल्प म्हणजे आश्वासनांची अतिवृष्टी, थापांचा महापूर आहे. सगळ्याच घटकांना आपल्यासोबत जोडण्याचा हा एक खोटा प्रयत्न आहे. देवेंद्र फडणवीसांच्या भाषेत हे खोटं नरेटिव्ह आहे. या योजनांसाठी आर्थिक तरतूद कशी करणार? याचा त्या कुठेही उल्लेख नाही. त्यांनी आजपर्यंत ज्या घोषणा केल्या, त्यातल्या किती पूर्ण झाल्या, यावर तज्ज्ञांची एक समिती नेमून विधानसभा निवडणुकांच्या आधी त्यावर श्वेतपत्रिका जाहीर करावी.
> – उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री

### मुलींना मोफत उच्च शिक्षण

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषीविषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित ८ लाख रूपयांपर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती.

**सौरऊर्जा पंप**
8,50,000 शेतकऱ्यांना देणार पंप

**अन्नपूर्णा योजना**
52,16,412 लाभार्थ्यांना मोफत तीन सिलिंडर

**तरुणांसाठी योजना**
10,000 कोटींची सरकारकडून तरतूद

**सिंधुदुर्गात स्कुबा डायव्हींग**
800 स्थानिकांना रोजगार
20 कोटींची तरतूद

### आईचे नाव बंधनकारक


दि. १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्याचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव या क्रमाने करण्याचे बंधनकारक.

## कारची कंटेनरला धडक

# दोघांचा मृत्यू, दोन जखमी

| रसायनी | वार्ताहर |

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर शुक्रवारी (दि. २८) दुपारी तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला. यामध्ये एका कारने समोरील कंटेनरला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले आहेत.



मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरून पुण्याहून मुंबईकडे कंटेनर क्रमांक (एमएच४६-बीएम१५३५) हा माल घेऊन जात असताना तो बोरघाटात आला असता पाठीमागून येणाऱ्या वॅगनर कार क्रमांक (एमएमच ४३ बीई ८५६२) ने समोरील कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. कंटेनरने समोरील तिसऱ्या अज्ञात वाहनाला धडक देऊन तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला. या अपघातात कारमधील ४ जणांपैकी २ जणांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटलची टीम, अपघातग्रस्त टीमचे सदस्य, खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस आदी तात्काळ घटनास्थळी दाखल होत कारमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर दोन व्यक्तींचे मृतदेह खोपोली नगरपालिका हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले आहेत.

## वाघाच्या नखासह बंदूक जप्त

### दिघी सागरी पोलिसांची कारवाई

| अलिबाग | प्रतिनिधी |


वाघाच्या नखासह बंदूक व काडतूस बेकायदेशीररित्या ठेवणाऱ्यांवर दिघी सागरी पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. दोन आरोपींपैकी एकजण अल्पवयीन असून, दुसरा ३४ वर्षीय आहे. त्याला अटक करण्यात आली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील वाकळघर गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मराठी शाळेजवळ काही मंडळींकडे बंदूक, जिवंत काडतूस आणि वाघाची नखे असल्याची माहिती दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांना मिळाली. त्यांनी पडताळणी केल्यावर पथक तयार केले. २७ जून रोजी दुपारी पावणे तीन वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. त्यावेळी त्यांना मुद्देमाल दिसून आला. तो सर्व पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतला. दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यातील अल्पवयीन मुलाला बालसुधारगृहात पाठविण्यात आले असून, दुसरा आरोपी अभिषेक गुजर (३४) आहे. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. माणगावमधील न्यायालयात आरोपीला हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे करीत आहेत.

## अपघातात एक ठार

**पनवेल :** मोटारसायकलला ट्रेलरने धडक दिल्याने विवेक वसंतराव रणसिंग (३२) याचा मृत्यू झाला. याप्रकरणी २४ वर्षीय अमरनाथ रामदौड मोरया या ट्रेलर चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विवेक रणसिंग (रा. विचुंबे) हा होंडा शाईन मोटारसायकल क्र. एमएच ०१ डीडब्ल्यू ०२४७ घेऊन जुना पुणे-मुंबई हायवेने पुणे ते पनवेल लेनवरून पनवेलकडे येत होता. पुण्याकडून पनवेलकडे येणारे ट्रेलर गाडी क्र. एमएच ४० बीएल ७९६५ वरील चालकाने विवेक रणसिंग यांच्या होंडा मोटारसायकलला पाठीमागून धडक दिली. दरम्यान, कोणत्याही प्रकारची वैद्यकीय मदत न करता व पोलिसांना माहिती न देता तो पळून गेला.

## साळावमध्ये अपघात, तरुण जागीच ठार



| अलिबाग | प्रतिनिधी |

वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनीत कामाला जात असताना बंद पडलेल्या ट्रकला दुचाकीची धडक लागली. त्यामध्ये तरुण गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास घडली असून, जेएसडब्ल्यू कंपनीसमोर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

चेतन पाटील असे या मृत तरुणाचे नाव आहे. हा शुक्रवारी (दि.२८) सकाळी मिठेखार येथून दुचाकीवरून वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनीत कामावर जात होता. साळाव येथील कंपनीच्या कर्मचारी वसाहतीजवळ खैराव येथे आल्यावर बंद पडलेला एक ट्रक रस्त्यातच उभा होता. त्या ट्रकला दुचाकीची जोरदार धडक लागली. या धडकेत तरुणाच्या चेहऱ्यासह डोक्याला दुखापत झाली. गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

पान २ वर

**पुढील चार दिवस अतिवृष्टी, दोन जुलैपर्यंत ऑरेंज अलर्टचा इशारा**

# रायगडकरांनो, सावधान!

| अलिबाग | प्रतिनिधी |

गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने दमदार मुसंडी मारली आहे. नदी, तलाव, विहिरींसह काही सखल भागांमध्ये आणि शेतांमध्ये पाणी साचू लागले आहे. अनेक भागांमध्ये पावसाच्या जोरदार व हलक्या सरी कोसळत आहेत. हवामान खात्याने पुढील चार दिवस म्हणजेच दोन जुलैपर्यंत ऑरेंज अलर्ट जारी केला असून, या कालावधीत अतिवृष्टी होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

भाताची रोपे लावणीयोग्य होऊनदेखील पाऊस नव्हता. कडक उन्हामुळे ही रोपे पिवळी पडण्याची भीती निर्माण झाली होती. अखेर बुधवारी रात्रीपासून जिल्ह्यात पावसाने सुरुवात केली. दोन दिवस जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये सतत पाऊस पडला. त्यामुळे पाण्याविना कोरडी पडलेल्या विहिरी, धरणे, तलावांमध्ये पाणी साचू लागले. जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ६९.२ टक्के पाऊस पडला आहे. ४२३.७ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. अलिबागसह रोहा, माणगाव, पनवेल, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांमध्ये ४८९ मि.मी.पासून ५५१ मि.मी.

पान २ वर

### भातशेतीच्या कामांना वेग

पावसामुळे भातलावणीची कामे थांबली होती. अखेर पावसाने सुरुवात केल्याने शेतकरी सुखावून गेला आहे. गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतांमध्ये पाणी साचल्याने उखळणीपासून लावणीची कामे सुरु झाली आहेत. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये शेतीच्या कामांना वेग आला असल्याचे दिसून येत आहे.





## कृषीवलच्या दणक्याने प्रशासनाला जाग

- **शाळांमध्ये जाऊन पोषण आहाराचे नमुने तपासले**
- **दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन**

| पेण | प्रतिनिधी |

कृषीवलमध्ये २८ जून रोजी 'विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करून पेण तालुक्यातील निकृष्ट पोषण आहाराचा लेखाजोखा मांडला. निकृष्ट आहार देऊन विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ चालल्याचा पर्दाफाश केल्यानंतर वातानुकूल खोल्यामध्ये बसणाऱ्या अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली.

निकृष्ट दर्जाचे आलेले सामान व धान्याविषयी ठेकेदाराला जबाबदार धरण्यापेक्षा मुख्याध्यापकांचीच शाळा गटशिक्षण अधिकारी अरुणादेवी मोरे व जिल्हा पोषण आहार अधीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी घेतली. काय तर, चोर सोडून संन्यासाला फाशी असेच म्हणावे लागेल.




मुख्याध्यापकांनी सामान व धान्य उतरवून घेताना त्याचा दर्जा तपासून घेणे गरजेचे असते. नंतरच ते सामान उतरवून घ्यायचे असते. परंतु, मुख्याध्यापकांचे म्हणणे असे आहे की, आम्ही सामान परत पाठवल्यास आमचे वरिष्ठ अधिकारी आम्हालाच जबाबदार धरतात आणि सामान पुन्हा येत नाही.

एकंदरीत काय तर, धान्य व सामान पुरवणाऱ्या ठेकेदाराच्या डोक्यावर राजकीय वरदहस्त असल्याशिवाय तो असे धाडस करू शकत नाही, अशी उलटसुलट चर्चा सुरू आहे. धरतात आणि सामान पुन्हा येत नाही. एकंदरीत काय तर, धान्य व सामान पुरवणाऱ्या

पान २ वर

# पेणमध्ये रिक्षा चालकांची मनमानी

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पेण शहरातील रिक्षा चालकांच्या मुजोरीने आता टोक गाठले असून, शहरातील वेगवेगळ्या भागात वाटेल त्या पद्धतीने भाडेदराची आकरणी सुरू असल्याने प्रवासी हैराण झाले आहेत. शहरातील वेगवेगळ्या भागात जाण्यासाठी मनमानेल त्यापद्धतीने भाडेआकारणी सुरू आहे. प्रवाशांची होणारी लूट थांबविण्याची मागणी होत आहे. रिक्षाचालक मीटरप्रमाणे भाडेआकरणी करीत नसतील तर लेखी तक्रार करावी, असे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सांगितले जातेय. तर, काही हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच रिक्षाचालकांमुळे अन्य रिक्षाचालक बदनाम होत असल्याचे रिक्षा संघटनेचे म्हणणे आहे.**



**ग्राहकांकडून मनमानेल तशी भाडे आकारणी**

पेण शहरामध्ये मीटरप्रमाणे भाडे आकारले जात नाही. शहरातील रिक्षा प्रवासासाठी मीटर पद्धतीचा अवलंब करावा, असा नियम आहे. मात्र, या नियमाची सर्रासपणे पायमल्ली केली जाते. मीटरऐवजी माणूस बघून भाडे आकरण्याची येथे जणू पद्धतच रुढ झाली आहे. रिक्षा चालक मालक संघटनेने उपप्रादेशिक परिवाहन विभागाशी सल्लामसलत करुन मीटरप्रमाणेच भाडे आकरणे बंधनकारक आहे. प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही.

पेण शहर एमएमआरडीएमध्ये एमएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात येत असून, याठिकाणी मीटरनुसार भाडे आकारणे गरजेचे आहे. परंतु, पेण शहरात एकही रिक्षा चालक मीटरनुसार भाडे आकारत नाहीत. मनमानेल तसे माणूस बघून भाडे आकारतात. पेण पोलीस ठाण्यापासून रामवाडीपर्यंत जायचे असेल तर ५० रूपयांपासून १०० रूपयांपर्यंत भाडे आकारले जाते. नगरपालिका नाक्यापासून रामवाडीकडे जायचे असेल तर ५० रूपयांपासून ८० रूपये भाडे आकारले जाते. पेण एसटी स्टँडवरून कुंभार आळीत जायचे असेल तर ३० ते ५० रूपये भाडे आकारले जाते. पेण एसटी स्टँडपासून प्रायव्हेट हायस्कूल, स्वामी कॉलेज, सार्वजनिक विद्या मंदिर, न्यू व्हिजन कॉलेज या ठिकाणी जाण्यासाठी ३० रूपयांपासून १०० रूपयांपर्यंत भाडे आकारले जातो. असे भाडे आकारणे नियमबाह्य आहे. ग्राहकांनी विचारणा केल्यास रिक्षा चालक उडवाउडवीची भाषा करतात. जर महिला ग्राहक असतील, तर त्यांची बोलतीच बंद करतात. पुरूष ग्राहकांच्या तर अंगावर धावून जातात. आमची कुणाकडेही तक्रार करा, आम्ही घाबरत नाहीत. आमची युनियन आहे. अशा प्रकारे वाद घालून ग्राहकांचा अपमान करत असतात. पेण शहरात जेवढे रिक्षा थांबे आहेत, त्यांना नियमानुसार प्रादेशिक परिवहन खात्याने कोठेही थांबा दिलेला नाही. माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागवली असता ही बाब समोर आली की, पेणमधील सर्वच रिक्षा थांबे हे अनधिकृत आहेत. असे असताना रिक्षा चालक कोणाच्या जिवावर ग्राहकांशी भांडत असतात आणि ग्राहकांची लूट करत असतात. याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी देवकाते व युनियन लिडर दत्ता म्हात्रे यांच्याशी आमच्या प्रतिनिधीनी संपर्क करून विचारणा केली.

> पेण शहरात मीटरनुसारच भाडे आकारायचे आहे. मधल्या काळात आम्ही मीटरदेखील रिक्षा चालकांकडून अपडेट करुन घेतले आहेत. आम्ही सक्ती करायला लागलो की युनियनवाले आवाज उठवतात आणि ग्राहकांची तक्रार नसताना तुम्ही आमच्यावर सक्ती करू शकत नाही अशा प्रकारे वैचारीक वाद घालतात. ग्राहकांनी मीटरप्रमाणे भाडे आकारले जात नाही म्हणून आमच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार करावी, आम्ही नक्कीच कारवाई करू. ग्राहक आणि शासन एकत्र आल्यास सहज अरेरावी करणाऱ्या रिक्षा चालकांविरूध्द कारवाई करता येईल.
>
> – महेश देवकाते, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण

> ग्राहक हे खऱ्या अर्थाने आमच्या रिक्षा चालकांचे दैवत आहेत. परंतु, काही रिक्षा चालक मुद्दामहून अरेरावी करून ग्राहकांची विनाकारण लूट करत आहेत, त्यांच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे. प्रमाणाबाहेर जे भाडे आकारतात त्यांचे नंबर आरटीओला दिल्यास आमच्या संघटनेची काही हरकत नसणार आहे. बोटावर मोजणाऱ्या काही रिक्षा चालकांमुळे रिक्षा चालक बदनाम होत आहेत. हे मला अध्यक्ष या नात्याने मान्य नाही.
>
> – दत्ता म्हात्रे, अध्यक्ष, तीनचाकी रिक्षा चालक मालक संघटना, पेण

# पनवेलमध्ये जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

प्रभाग क्रमांक १८ मधील परदेशी आळी येथील रस्त्याचे काँक्रिटीकरण काम व इमारत पुनर्विकासची कामे चालू आहेत. सदरच्या कामांची डॉ. सुरेखा मोहोकर वारंवार स्वतः उभे राहून पाहणी करीत असतात व नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करीत असतात. इमारत पुनर्विकास करणाऱ्या विकासकाने संपूर्ण गटार माती टाकून बंद केले होते. यामुळे पाण्याचा निचरा होण्यास प्रतिबंध होत असल्याची तक्रार तसेच राडारोडा पडलेला असल्यामुळेदेखील नागरिकांना याचा त्रास होत होता. रस्त्यावरील काम पूर्ण झाल्यानंतर पाण्यासाठी केलेली वाटदेखील तशीच राहिल्यामुळे नागरिकांचे होणारे अपघात अशा अनेक गोष्टींच्या तक्रारी आल्या होत्या. यासंदर्भात शेकाप नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर यांनी बुधवारी स्वतः जातीने हजर राहून रस्ते इंजिनिअर ऋषिकेश, अमित ठाकूर, प्रभाग अधिकारी माळी यांच्याकडे पाठपुरावा करत जेसीबीने सर्व सफाई करून घेतली.


## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मांडला. ता. मुरुड, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची मिळकत श्री. निलेश गोविंद थळे याच्या मालकीची असून सदरील मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाकडून माझे अशिलानी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| मांडला. ता.मुरूड, जि.रायगड | १९१/१/१ | ००-३३-४०<br>पो.ख ००-०७-६०<br>एकुण ००-४१-०० | ०.३४ |
| सदर मिळकतींपैकी दुसरेपक्षी यांचे मालकीचे ०-२१-०० हे. आर. क्षेत्र आकार ०.१८रू.पै. व तिंतील ग्रुप ग्रामपंचायत मांडला हद्दीतील मौजे महाळुगे खुर्द येथील मालमत्ता नं. ५१६, क्षेत्र २४.६ X १७.६ एकूण ४३२.९ चौ.फूट (४०.२३ चौ.मी.) यासह. | | | |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तीनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २७/०६/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा पो. झिराड.
ता. अलिबाग, जि. रायगड.


# काकामहाराज भोंदूबाबाला अटक

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यात अनेक वर्षे भोळ्याभाबड्या लोकांना अंधश्रद्धा, रियल इस्टेट खरेदी-विक्री, कमी किमतीत सोने तसेच नरबळी वगैरे भुलथापांद्वारे गंडविणाऱ्या भोंदूबाबा काकामहाराज उर्फ पंढरीनाथ गणपती पवार याला पैशाचा पाऊस आणि हवेतून गुप्तधन काढून देण्याचे आमिष दाखवून ३६ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक केली आहे. सातारा पोलिसांनी २४ तासांत पोलादपूर तालुक्यातून मुसक्या बांधून नेल्याने सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे. आरोपीची पत्नी एका राजकीय पक्षाची तालुका पदाधिकारी असल्याने त्याचे अनेक बड्या राजकीय व्यक्तींसोबत सौहार्दपूर्ण संबंध असल्याची चर्चाही या अटकेच्या निमित्ताने तालुक्यात सर्वत्र होऊ लागली आहे.

पत्नी राजकीय पक्षाची पदाधिकारी असल्याने हा 'काका महाराज' या टोपणनावाने सातारा जिल्ह्यातवावरणारा भोंदूबाबा नेहमीच भोळ्याभाबड्या तसेच हव्यासी लोकांना ठकवून लाखो रूपयांना गंडा घालत असल्याची चर्चा अनेक वर्षांपासून पोलादपूर तालुक्यात सर्वत्र होत असे. मात्र, कितीही किस्से चर्चेत आले तरी भोंदूबाबा काकामहाराज उर्फ पंढरीनाथ गणपती पवार याला पोलिसांच्या खाकी वर्दीचा हिसका पाहावा लागला नसल्याचीही प्रौढी तालुक्यातील जनतेत काकामहाराजांच्या अनेक अनुयायांकडून होत असे.

सातारा शहर पोलीस ठाणे हद्दीतील एका तक्रारदाराला भोंदूबाबा काकामहाराज उर्फ पंढरीनाथ गणपती पवार याने अघोरी पूजा, जादूटोणा, चमत्कार व टोटक्याच्या वस्तुंच्या विक्रीतून पैशाचा पाऊस आणि हवेतून गुप्तधन काढून देण्याचे आमिष दाखवून वेळोवेळी रोख व ऑनलाईन स्वरूपात ३६ लाखांना गंडा घातला असल्याची तक्रार २५ जून २०२४ रोजी तक्रारदाराने पोलीस ठाण्यात दाखल केली. यावेळी तक्रारीच्या अनुषंगाने सातारा शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र म्हस्के यांनी सूचना दिल्यानुसार सातारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने रायगड जिल्ह्यातील काही संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसोशीने तपासणी करून मिळविलेल्या माहितीच्या आधारे आरोपीला पोलादपूर येथून ताब्यात घेतले. यावेळी आरोपीने काही साथीदारांच्या मदतीने गुन्हा केल्याचे कबूल केले असल्याची माहिती तपासिक अंमलदार सहायक पोलीस निरीक्षक मते यांनी दिली.

पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, सातारा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र म्हस्के यांच्या

- **पैशाचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून ३६ लाखांची फसवणूक**
- **आरोपीचे अनेक बड्या राजकीय व्यक्तींसोबत सौहार्दपूर्ण संबंध?**

मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस निरिक्षक सुधीर मोरे, पोलीस हवालदार निलेश यादव, सुजीत भोसले, निलेश जाधव, पोलीस नाईक पंकज मोहिते, पोलीस कॉन्स्टेबल सचिन रिटे, इरफान मुलाणी, संतोष घाडगे, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, मच्छिंद्रनाथ माने, सुशांत कदम, तुषार भोसले आदींनी या कारवाईत सहभाग घेत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. याप्रकरणी अधिकाधिक आरोपी असण्याची शक्यता लक्षात घेऊन भोंदूबाबा काकामहाराज उर्फ पंढरीनाथ गणपती पवार याच्यासोबत कोणाकोणाचा सहभाग आहे, याचा तपास घेऊन सातारा पोलीस पुन्हा पोलादपूर तालुक्यात येण्याची शक्यता व्यक्त झाल्याने पोलादपूर तालुक्यातील राजकीय क्षेत्रासह, अंधश्रध्दा पसरविणाऱ्या व्यक्ती तसेच रियल इस्टेट व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.


## TENDER NOTICE

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Executive Engineer, MSEDCL, Division, Panvel- R invites Tender from reputed e-registered contractors with MSEDCL. The details are given below:

| Tender No. | Description of Work | Tender Amount / EMD/ Tender Fee | Tender available dates from /to |
|---|---|---|---|
| EE/PNLR/ T/T-05/2024-25 | Reading through MRI for PC-0 consumers having load below 20 KW & Above 20 KW, DATA ENTRY & Manual Meter Reading in MR09 Format (In case of non communicating meters only) UNDER Panvel (R) Division | Rs. 3000000/- Rs. 30000/- Rs 2950/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-06/2024-25 | Hiring of Vehicle for Dy. Executive Engineer Karjat Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-07/2024-25 | Hiring of Vehicle for Dy. Executive Engineer Khalapur Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-08/2024-25 | Hiring of Vehicle for Dy. Executive Engineer Khopoli Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-09/2024-25 | Hiring of Vehicle for Dy. Executive Engineer Panvel-II Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-10/2024-25 | Hiring of vehicle for Executive Engineer Panvel (R ) division | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-11/2024-25 | Hiring of Utility Vehicle (Pick up Van/ Tempo) for Dy. Executive Engineer Karjat Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/T/ T12/2024-25 | Hiring of Utility Vehicle (Pick up Van/ Tempo)for Dy. Executive Engineer Khalapur Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-13/2024-25 | Hiring of Utility Vehicle (Pick up Van/ Tempo) for Dy. Executive Engineer Khopoli Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-14/2024-25 | Hiring of Utility Vehicle (Pick up Van/ Tempo) for Dy. Executive Engineer Panvel-II Subdivision | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |
| EE/PNL-R/ T/T-15/2024-25 | HIRING OF VEHICLE FOR DIVISION STORE, PANVEL(R) DIVISION | Rs. 1000000/- Rs. 10000/- Rs. 1180/- | From 29.06.2024 to 09.07.2024up to 15:00 HRS |

Bid documents will be available on website from **29.06.2024 TO 09.07.2024 up to 15.00 Hrs.** Last date for submission is on **09.07.2024** up to **15.00 Hrs.** Details are available on our website **https://etender.mahadiscom.in/eatApp/**. For any additional information please contact office of the Executive Engineer, MSEDCL, Division – Panvel-R, Bhingari, Panvel, Dist- Raigad -410 206 (Maharashtra) during office working hours.

Contact person: Mr. Komal Bhakare 9029162781



## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलोशी, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतींपैकी ०-२१-० हे. आर एवढे क्षेत्र विद्यमान मालक दत्तात्रेय गौरु सोपेकर, रा. बेलोशी, पो. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा लेखी करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बेलोशी, ता.अलिबाग, जि. रायगड | ८५ | २-२५-३० | १९-८० |
| वर नमूद मिळकतींपैकी लिहून देणार यांचे हिश्याच्या क्षेत्रापैकी ०-२१-० हे. आर मिळकत | | | |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २८.६.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय
अलिबाग समोर, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२


# प्रभावती जाधव यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**



सिद्धेश्वर येथील रहिवासी कीर्तनकार प्रभावती विठ्ठल जाधव यांचे गुरुवार, दि. २० जून रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच वारकरी संप्रदायाचे असंख्य नागरिक व समस्त सिद्धेश्वर ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मच्छिंद्र जाधव, पंढरीनाथ जाधव ही दोन मुले, वर्षा जांबेकर ही एक मुलगी, सुना, नातवंडे व मोठा जाधव परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शनिवार, दि. २९ जून रोजी, तर उत्तरकार्य विधी मंगळवार, दि २ जुलै रोजी त्यांच्या सिद्धेश्वर येथील राहत्या घरी होणार असल्याचे कुटुंबियांनी सांगितले.

**पान १ वरून**

## निवडणुकांचा अर्थ, कर्जाचा संकल्प

**अर्थसंकल्पातील वैशिष्ट्यं :**

शासनाकडून रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करणार.

एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी

सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय. वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये

अनुसूचित जाती उपयोजनेकरीता १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरीता१५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्यय

सन २०२४-२५ मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद

महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये,महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये

महसुली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये

**अर्थसंकल्पात कोणत्या विभागाला किती निधी देणार याचा यात उल्लेख नाही. कृषी, पाटबंधारे, सामाजिक न्याय, गृहनिर्माण अशी विभागवार निधीची तरतूद नसणारा राज्याच्या इतिहासातील हा पहिला अर्थसंकल्प आहे. ज्या घोषणा केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी कितपत होईल याबाबत शंका असून राज्यातील जनतेची दिशाभूल करणारा बोगस, पोकळ घोषणांचा जुमलेबाज अर्थसंकल्प आहे.**

**- नाना पटोल, प्रदेशाध्यक्ष काँग्रेस**

**फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प आज अर्थमंत्र्यांनी विधानसभेत सादर केला आहे. अडीच वर्षे तिजोरी साफ करून झाल्यावर सरकारी तिजोरीवर महायुती सरकारने शेवटचा हाथ मारून तिजोरी साफ केली आहे. स्वत:चे खोके भरून झाल्यावर जनतेसाठी काहीतरी केल्याचा केविलवाणा प्रयत्न या अर्थसंकल्पात केला आहे.**

**- विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते**

## रायगडकरांनो, सावधान!

पर्यंत, तर कर्जत, उरण, खालापूर, पेण या तालुक्यांमध्ये २१४.३ मि.मी. पासून ३८३.८ मि.मी.पर्यंत पावसाची नोंद झाली आहे.

जिल्ह्यामध्ये २९ जूनपासून २ जुलैपर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. विनाकारण घरातून बाहेर पडू नका, विजेच्या अथवा झाडाच्या बाजूला थांबू नका, सखल भागात साचलेल्या पाण्याचा अंदाज घेऊनच वाहने चालवा, असे आवाहन प्रशासनाकडून केले असून, दरडग्रस्त व पूरग्रस्त भागातील नागरिकांनाही याबाबत सूचना केल्या असल्याचे सांगण्यात आले आहे.

## साळावमध्ये अपघात, तरुण जागीच ठार

या घटनेची माहिती मिळताच मृताचे नातेवाईक व मिठेखार येथील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर जमाव केला. त्यामुळे काही काळ कंपनीसमोर तणावाचे वातावरण निर्माण झाले. जमावाने मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला होता. वसाहतीजवळील रस्त्यावर उभा असलेला ट्रक बंद होता. मात्र, येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना केली नाही. त्यामुळे हा अपघात झाल्याचा ठपका नातेवाईकांनी ठेवला.

## कृषीवलच्या दणक्याने प्रशासनाला जाग

ठेकेदाराच्या डोक्यावर राजकीय वरदहस्त असल्याशिवाय तो असे धाडस करू शकत नाही, अशी उलटसुलट चर्चा सुरू आहे. आज तालुक्यातील काही शाळांमध्ये जाऊन धान्य प्रत्यक्ष तपासले तर काही शाळांमधून धान्याचे नमुने मागवून घेतल्याची माहिती जिल्हा पोषण आहार अधीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली. तसेच दोषींवर कारवाई करणार असून, ठेकेदाराला विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ करू दिला जाणार नाही, असेही ते म्हणाले.


## ग्रुप ग्रामपंचायत जासई
### मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधीतून वस्तू खरेदी कामी पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ नं. | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | वस्तू पुरवठा करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत जासई हद्दीतील १ ते ७ अंगणवाडी यांना RO फिल्टर पुरविणे | १५ वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | ८५,०००/- | ३ महिने |
| २ | कार्बोलिक पावडर व जंतूनाशक औषधे खरेदी करणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | ६०,८००/- | ३ महिने |
| ३ | जासई ग्रामपंचायत हद्दीतील महिलांना व मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण देणे. | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १,००,०००/- | ३ महिने |
| ४ | निवडून आलेले प्रतिनिधी आणि कार्यकर्ते यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण देणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १०,०००/- | ३ महिने |
| ५ | ग्रामसभा व महिलासभा यामध्ये सक्रीय सहभागासाठी जन जागृती करणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १०,०००/- | ३ महिने |
| ६ | विविध योजना अंतर्गत लाभार्थ्यांचा समावेश करणेबाबत जन जागृकता करणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १०,०००/- | ३ महिने |
| ७ | सार्वजनिक सेवांबाबत जन जागृकता करणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १०,०००/- | ३ महिने |
| ८ | महिलांच्या सेवाबाबत जन जागृती शिबीर घेणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | २५,०००/- | ३ महिने |
| ९ | जासई ग्रा.पं.हद्दीतील १ ते ७ अंगवाड्यांना वजन काटे पुरविणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १,०९,३२०/- | ३ महिने |
| १० | डुंबा आदिवासीवाडी येथील अंगणवाडी करीता फर्निचर खरेदी करणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | ५०,०००/- | ३ महिने |
| ११ | ग्राम पंचायत कार्यालय संगणक प्रिंटर खरेदी व देखभाल करणे | १५वा वित्त आयोग सन २३/२४ अबंधित | १,३२,६६६/- | ३ महिने |
| १२ | एकटघर येथे ओपनजिम साहित्य खरेदी करणे | १५वा वित्त आयोग सन २४/२५ अबंधित | २,००,०००/- | ३ महिने |

**अटी व शर्ती** -१.दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा.सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक २९/०६/२०२४ ते ०७/०७/२०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२.नोंदणीकृत तसेच GST धारक पुरवठादार असावा.
३.कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४.ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०८/०७/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५.कोणत्याही नामंजून निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६.सदर खरेदी वस्तूंची किंमत PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाण : जासई
दिनांक : २९/०६/२०२४

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत जासई**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत जासई**

निवडक

### तंटक यांचा निरोप समारंभ

**मुरूड :** नचिकेता हायस्कूल मुरुड तर्फे शाळेतील कार्यरत मुख्याध्यापक योगेश तंटक यांना सेवा समाप्ती निमित्त भावपूर्ण निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संस्थेच्या विश्वस्त मुग्धा दांडेकर, मंगेश दांडेकर, आराधना दांडेकर, प्रमुख अतिथी प्रा. मेघराज जाधव, मुख्याध्यापक योगेश तंटक, प्रभारी मुख्याध्यापिका प्रियांका दांडेकर, समीर डेरे व शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी संस्थेतर्फे योगेश तंटक यांचा सत्कार करण्यात आला.

### स्वसंरक्षण प्रशिक्षण संपन्न

**उरण :** जायन्टस् ग्रुप उरण व श्री समर्थकृपा सखी स्वयंसहायता संस्था उरणतर्फे मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण संपन्न झाले. हे स्वसंरक्षण प्रशिक्षण नेव्ही वेल्फेअर आणि वेलनेस असोसिएशन करंजा इथे मोफत ठेवण्यात आले होते. नेव्ही वेल्फेअरच्या अध्यक्ष राजलक्ष्मी रेड्डी, उपाध्यक्ष निवेदिता पाठक, सचिव गीता विनोद, खजिनदार निर्मला यादव, यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. त्याचप्रमाणे या प्रशिक्षणासाठी प्रविण साहू यांचेही सहकार्य मिळाले.

### शाहू महाराज जयंती साजरी

**तळा :** महाराष्ट्राच्या मातीत सामाजिक समतेची प्रतिष्ठापणा, बहुजन समाजाच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती गो.म.वेदक विद्यामंदिर तळा येथे साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप ढाकणे यांनी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. तसेच गो.म.वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांनी शाहू महाराज यांना अभिवादन केले.

### षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा संपन्न

**चिरनेर :** पनवेल तालुक्यातील कासरभट येथील हौशी नाट्य कलावंत अरुण गोपाळ म्हात्रे यांचा षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा २५ जून रोजी पनवेल तालुक्यातील कासरभट येथे नाट्य कलाकारांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी नाटककार हासुराम हे आपल्या मनोगतात बोलत होते. याप्रसंगी अष्टगंध कलामचाचे कार्याध्यक्ष अशोक म्हात्रे, दिग्दर्शक गजानन म्हात्रे, नाट्य कलावंत प्रज्योत पाटील, तसेच सगे सोयरे, आप्तेष्ट आणि मित्रमंडळीही मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### डम्पिंग ग्राऊंडसाठी निवेदन

**तळा :** तळा शहरातील धरणालगत असलेले डम्पिंग ग्राऊंड हटविण्यासाठी नगराध्यक्षा माधुरी घोलप यांना गिरणे ग्रामपंचायतीतर्फे निवेदन देण्यात आले आहे.नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीच्या जवळच डम्पिंग ग्राऊंड असल्याने डम्पिंगमधील ओला, सुका सडलेला कचरा नदी प्रवाहाद्वारे विहिरीत झिरपत असल्याने विहिरीचे पाणी दूषित झाले आहे. या दूषित पाण्यामुळे या तिन्ही वाड्यांमध्ये साथीचे रोग पसरून बहुतांश कुटुंबातील सदस्य आजाराने त्रस्त झाले आहेत.

# विद्यार्थ्यांना मिळाला प्रवासी पास

## माणगाव एसटी आगाराकडून हालचाली सुरू

**। माणगाव । वार्ताहर ।**

**विद्यार्थ्यांनी आता एसटी पाससाठी बसस्थानकात रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. शाळांनी पुरवलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीनुसार माणगाव बस आगाराचे कर्मचारी एसटीचे पास थेट शाळेत येऊन देणार आहेत. यासाठी शाळा प्रमुखांनी पास साठी विद्यार्थ्यांची यादी माणगाव आगाराकडे द्यावी, अशी माहिती माणगाव बस आगाराचे व्यवस्थापक कोळी यांनी दिली.**





माणगाव तालुक्यातील विविध शाळा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पास साठी रांगेत ताटकळत बसण्याची गरज नाही. माणगाव बस आगारांने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडसर निर्माण होऊ नये तसेच विद्यार्थ्यांचा वेळ व पैसा वाचणार असून परिवहन महामंडळाने एसटी पास थेट तुमच्या शाळेत हा अभिनव उपक्रम यशस्वी राबविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे.

माणगाव आगारांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना बस आगाराचे कर्मचाऱ्यामार्फत शाळेत जाऊन पास देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठी बस आगाराच्या कर्मचाऱ्यांनी माणगाव शहरातील, तसेच सर्व भागातील शाळांना भेटी दिल्या आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देणार असून यासाठी शाळांनी विद्यार्थ्यांची यादी देणे आवश्यक आहे.

यंदाचे वर्षी माणगाव आगाराने विद्यार्थांना पास पास देण्याचे उदिष्ट ठरवले असून जून महिन्यात १२५५ विद्यार्थी पास, १२५५ विद्यार्थी पास तर ४२ अहिल्याबाई होळकर, जुलै २७६२ विद्यार्थी पास तर १८३४ अहिल्याबाई होळकर पास, ऑगस्ट २५९३ विद्यार्थी पास, सप्टेंबर ३५२९ विद्यार्थी पास, ११६८ अहिल्याबाई होळकर पास, ऑक्टोबर ११५९ विद्यार्थी पास तर ९ अहिल्याबाई होळकर पास, नोव्हेंबर २९०२ विद्यार्थी पास तर ८१५ अहिल्याबाई होळकर पास वितरीत करण्यात येणार आहे.

> आतपर्यंत बस आगार कर्मचाऱ्यांनी गोरेगाव ना. म जोशी विद्यालय, गोरेगाव उर्दू हायस्कूल, पन्हळघर जे.बी. सावंत हायस्कूल, तळा गो. म वेदक विद्यालय, उसर अभिनव ज्ञानमंदिर, बोरवाडी सुशीला का. भाटे माध्य विद्यालय, माणगाव कामेरकर हायस्कूल या सात माध्यमिक विद्यालयांना भेटी दिल्या आहेत. आतापर्यंत ३२६ विद्यार्थांना पास असून २४ अहिल्याबाई होळकर पास देण्यात आले आहे. तसेच कांही विद्यार्थांचे ॲडमिशन पूर्ण झाल्यावर पूर्ण यावी घेवून पासेस वाटप करण्यात येणार आहे.
>
> \- छाया कोळी, आगार व्यवस्थापक माणगाव

## चौक - मोरबे धरण रस्त्याची दयनीय अवस्था

**। रसायनी । वार्ताहर ।**



चौक ते मोरबे धरणाला जोडणारा रस्ता आणि त्या परिसरातील गावात जाणाऱ्या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून या दुर्दशेला रेल्वे प्रशासन जबाबदार असल्याचे स्थानिक नागरिकांचे मत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार ते मोरबे धरण यांना जोडणारा रस्ता असून या मार्गावर चौक नवीन वसाहत, नानिवली, नानीवली वाडी, नम्राची वाडी, मोरबे धरणग्रस्त वसाहती, मोरबे धरण प्रकल्प कार्यालय आणि गेल्या वर्षी १९ जुलै २०२३ रोजी इरसाल वाडी दुर्घटना घडली, त्या गावचे पुनर्वसन याच मार्गावर होत आहे.

चौक नवीन वसाहत येथे पनवेल कर्जत रेल्वे मार्गावर मोठा पुल आहे. याच पुलाखालून सर्व वाहतूक होत असते, मोरबे धरणाकडे जाताना पुलाची हद्द संपल्यावर रेल्वे मार्गाचे काम करणाऱ्या यंत्रणेचे गोडाऊन आहे,आणि इथूनच सर्व काम काज चालते. ठिकाणाहून रेल्वे मार्गासाठी लागणारे साहित्य पुरवले जाते. त्यामुळे अवजड वाहने, मिक्सर, पोकलन, जेसीबी यांची ये-जा होत असते. या अवजड वाहनांमुळे रस्त्याची चाळण झाली आहे असे स्थानिकांनी सांगितले.

अद्याप पावसाळा झाला नाही,तरीही या पुलाखाली पाणी साठते आहे,रस्त्याची चाळण झाल्याने दुचाकीचालक अनेकवेळा पडून जखमी झाले आहेत. लहान विद्यार्थी यांची ने आण करतांना अतिशय धोका पत्करावा लागतो. समोरासमोर दोन गाड्या आल्यास खूपच त्रासदायक ठरत आहे. विशेष म्हणजे पुलाच्या दोन्ही बाजूला अवघड वळणे आहेत. समोरासमोर दिसत नसल्याने जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो असे काही तरुणांनी सांगितले. यामुळे रेल्वे प्रशासन यांनी रस्ता दुरूस्ती करावी असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे, अन्यथा आवाहनचे आव्हानात रूपांतर होईल, अशी तिखट प्रतिक्रिया तरुणांनी दिली.

## प्रकल्पग्रस्तांचे न्यायासाठी उपोषण

**। रसायनी । वार्ताहर ।**



मोर्बे धरणग्रस्त आंदोलनाची सुरुवात गुरुवारी (दि.२७) पासून मोर्बे धरणाच्या समोर झाली आहे. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व प्रकल्पग्रस्त एकवटले आहेत. गेली ३४ वर्ष मोरबे धरणग्रस्त कृती समितीच्या माध्यमातून आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढा दिला जात आहे. शासनाला जागे करण्याचे मोरबे धरणग्रस्त कृती समितीने ठरवले आहे.

मोरबे धरणाच्या समोर आणि चोख पोलीस बंदोबस्त असताना उपोषण सुरु झाले आहे, महिला भगिनींची उपस्थिती दर्शनीय आहे. आमची सहनशीलता संपली आहे. त्यामुळे पहिले तीन दिवस साखळी उपोषण होईल. चार दिवसानंतर बेमुदत उपोषणाला सुरुवात होईल. त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही तर नवी मुंबईला होणारा पाणी पुरवठा बंद करण्याचा इशारा देण्यात आला आह. शासनाने दखल घेतली नाही तर लहान मुले, महिला पुरुष तरुण व वयस्कर मोरबे धरणात जल समाधी घेतील असा धरणग्रस्तांनी इशारा दिला आहे.

मोर्बे धरण करताना कोणताही पुनर्वसन कायदा लागू न करता या धरणाच्या कामास बेकायदेशीर जमिनी संपादन करून धरण पूर्ण केले. ३४ वर्ष पूर्ण झाले तरी नागरी सुविधा, नोकरी, पर्यायी जमीन उपलब्ध करून दिली नाही हीच खंत आज उपोषण करणाऱ्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अध्यक्ष जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष परशुराम मिरकुटे, सचिव योगेश प्रबळकर, किशोर निकाळजे, मिलिंद राणे यांच्यासह त्यांना पाठींबा देण्यासाठी मोतीराम ठोंबरे, श्याम साळवी आदी नेते उपस्थित होते.


## स्थानकाच्या भुयारात पाणी

**। उरण । वार्ताहर ।**

पाऊस पडताच उरण स्थानकांच्या भुयारी मार्गात पाणी साचू लागले आहे. त्यामुळे उरण स्थानकांच्या भुयारी मार्गातील पाणी समस्या कायम असल्याचे उघड होते. गेल्यावर्षी उरणमधील तरुणांनी स्थानकात साचलेल्या या पाण्यात डुंबून पोहण्याचा आनंद घेतला होता. हे प्रसारण दिल्ली दरबारापर्यंत पोहचल्याने पीएमओ विभागाने या प्रसारणाची दखल घेतली गेली होती.पहिल्याच पावसात नव्याने उभारण्यात आलेल्या स्थानकांत चार ते पाच फूट पाणी साचल्याने पावसाळ्यात या स्थानकांची स्थिती कायम राहिल, असे जाणकारांचे मत आहे.

## कर्जत शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत शहरामध्ये २०२० साली शासकीय निधीमधून शहरातील विविध भागासाठी जवळपास ५१ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते. मात्र त्यापैकी केवळ दहा कॅमेरे कार्यरत असल्याचे निदर्शनास येत आहे. याकडे नगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी समन्वय साधून कॅमेरा पुन्हा कार्यान्वित करावेत अशी मागणी नागरिक करीत आहे.

कर्जत शहराची वाढ होत असून व्यापक मागील काही वर्षांपासून शहरात नागीरकीकरण वेगाने वाढले आहे. शहरात अनेक छोट्या-मोठ्या चोऱ्या, छोटे- मोठे गुन्हे घडताना दिसून येत आहेत. यासाठी शहरात होणाऱ्या घडामोडी आणि हालचाली यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे महत्वाचा दुवा ठरत असतात. हि बाब लक्षात घेऊन तत्कालीन नगरसेवक नितीन सावंत यांनी विधान परिषद सदस्य अनिल परब यांच्या निधीमधून एकूण ५१ सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी करण्यात आले होते.

त्यापैकी केवळ १० सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत. यामुळे शहरात असुरक्षितता जाणवत आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने तपासात अडचणी निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अनेक घटनांचा तपास घेताना सीसीटीव्ही महत्वाचे दुवे ठरत आहेत.

कर्जत बाजारपेठेतील मुख्य चौकात, नाक्यावर कॅमेरा नसल्याचे निदर्शनास येत आहे.

कर्जत शहरात लावलेल्या कॅमेऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीचे कोणतेही काम कर्जत नगरपरिषदकडे नसून त्याचे पूर्ण सेटअप पोलीस स्टेशन येथे आहे.

> दरम्यान कर्जत नगरपरिषदेच्या वतीने कर्जत शहरात १७० कॅमेऱ्याचा प्रकल्प तयार असुन निधीअभावी ही योजना प्रलंबित आहे. कागदोपत्री असलेल्या ५१ कॅमेरा पैकी फक्त २८ कॅमेरा लावलेले दिसून येत आहेत. तर उर्वरित कॅमेरे नक्की कुठे लावले आहेत. हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे. तूर्तास ५१ कॅमेऱ्याची दुरुस्ती करून कॅमेरा सुस्थितीत व्हावेत ही मागणी जोर धरू लागली आहे.
>
> \- वैभव गारवे, मुख्याधिकारी तथा प्रशासक

## जमिनीच्या मोबदल्यासाठी आदिवासी बांधवांचे उपोषण

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

जांबरूंग उंबरविरा ठाकूरवाडी येथील आदिवासी बांधवांच्या जांबरुंग धरण बांधण्यासाठी पाटबंधारे विभागाने जमिनी घेतल्या असून त्यांना त्यावेळी दिलेला मोबदला हा अतिशय तुटपुंजा असून त्यांना आताच्या बाजारभावाप्रमाणे मोबदला मिळावा यासाठी वरदानी आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्थेच्या नेतृत्वाखाली खालापूर तहसीलवर मोर्चा काढून उपोषण सुरू केले आहे.

पाटबंधारे विभाग कर्जत यांच्याकडून सन १९९१/९२ साली आदिवासींची ४९.५० हेक्टर जमिन बेकायदेशीर संपादित केली. मात्र जांबरूंग धरणाचे काम २०१९ ला चालू झाले असून अद्याप पर्यंत पूर्ण झाले नाही. त्या शेतकऱ्यांना २०२४ च्या बाजारभावाप्रमाणे गुंठा १२ लाख रूपये मोबदला सरकारने द्यावा, जांबरूंग उंबरवीरा येथील शेतकऱ्यांची सर्व भातशेती जमीन पाटबंधारे विभागातून उत्खनन केली असल्याने सदर गावात १४५ घरे असून त्यांना सरकारकडून मोबदला मिळत नाही तोपर्यत उदरनिर्वाहासाठी ५०००० रुपये पोटगी द्यावी, दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, या मागण्यांसाठी खालापूर तहसील कार्यालयासमोर आदीवासी बांधवांनी उपोषण सुरू केले आहे.



**मुरूड परिसरात दोन दिवस जोरदार पाऊस आहे. पुढील ३ दिवस हवामान खात्याने हाय अलर्ट जाहीर केला आहे. जंजिरा किल्ल्यात व राजपुरी बेटावर १२ वाजता लाटा उसळत होत्या. (छायाचित्र : सुधीर नाझरे)**


## मुरूडला पावसाळी पर्यटन बहरणार

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात यंदा पाऊस जास्त असल्याचे भाकीत हवामान खात्याने केले आहे. यामुळे मुरूडला पावसाचे प्रमाण जास्त असेल. खारआंबोली धबधबा, गारंबी धबधबा, चिचघर धबधबा, नागशेत धबधबे पाण्याने पूर्ण लवकर भरल्यास मुरुडला पावसाळी पर्यटनाला येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढणार आहे. मुरूडचे पर्यटन पावसाळी विविध ठिकाणच्या धबधब्यामुळे बहरते. हॉटेल व्यावसायिकांची आर्थिक कोंडीपासून सुटका पावसाळी पर्यटनामुळे होते.

यंदा पावसाळ्यात पर्यटक आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने येणार आहेत. त्यासाठी मुरुड परिसरातील हॉटेल व्यवसायिक तयारीत आहेत.परंतु दरवर्षी होणारे अपघात पहाता जिल्हाधिकाऱ्यांनी पर्यटकांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे हे जाहीर केले. मुरुड तालुक्यात पर्यटनावर आर्थिक उलाढाल अवलंबून आहे, नोकऱ्या नसल्याने युवावर्ग पर्यटन व्यवसायात शिरत आहे. मुरुडला अनेक धबधबे असल्याने येणारे पर्यटकांची संख्या वाढली आहे आणि म्हणूच पोलिसांनी योग्य नियोजन केल्यास पर्यटन वाढेल अशी आशा मुरुडकरांना आहे

पावसाळी पर्यटनाच्या मर्यादित काळात अमर्याद पर्यटक विविध स्थळांना भेटी देतात. शनिवार-रविवार आणि जोडून सुट्ट्यांच्या काळात तर गर्दीचे विक्रम नोंदविले जातात. विशेषत: पावसाच्या सरी बरसत असताना कांदाभजी, भुट्टा, नॉनव्हेज, वडा-पाव खात खात भिजतानाचा आनंद घेण्यासाठी पर्यटनस्थळे हाउसफुल्ल होतात. स्थानिक प्रशासन कोलमडते आणि शेवटी बरीचशी पर्यटनस्थळे ऐन हंगामात बंद केली जातात. यातून स्थानिक रोजगार आणि महसूल मोठ्या प्रमाणात बुडतो. तरी होईल व्यवसायिकांची मागणी आहे कि धबधबे चालू ठेवा पोलिसांनी नियोजन करून मद्यपीवर कडक कारवाई करा पण अशी पर्यटन स्थळे बंद करू नका, धरणावर जाण्याची वेळ निश्चित करा व वाहनांसाठी पार्किंगची सुविधा करून पर्यटकांना शिस्त लावण्याचा प्रयत सरकारने करावा अशी मागणी व्यवसायिक करत आहेत. पर्यटनासाठी गारंबी धरण, सावंतखडा धबधबा, चिचघर धबधबा, खारआंबोली धरण आहे. हि पर्यटन स्थळे विकसित करण्याची गरज आहे. गारंबी धरणावर ओव्हरफ्लो होऊन पाणी नदीला वाहून जाते त्या बंधाऱ्यावर जाण्यासाठी रस्ता करण्याची गरज आहे.



## पावसाळी पर्यटनासाठी माथेरानला पसंती

# धुक्यात हरवले माथेरान

**। माथेरान । वार्ताहर ।**

**माथेरानला निसर्गाचा वरदहस्त लाभला असून पावसाळ्यात चार महिने संपूर्ण आजूबाजूच्या परिसरात व डोंगर कुशीत धुक्याची चादर पसरलेली असते त्यामुळे येथील निसर्गाची शोभा पर्यटकांना भुरळ टाकल्याशिवाय राहत नाही. जून महिन्यात पावसाची चाहूल लागताच पिकनिकच्या योजना आखल्या जातात विशेष ट्रेकिंगसाठी माथेरानला पसंती दिली जाते.**



माथेरान सुरक्षेच्या दृष्टीने एक आदर्श पर्यटन स्थळ म्हणून मागील काही वर्षांमध्ये प्रसिद्धीस आलेले आहे. अगदी मुंबई- पुणे पासून जवळ असलेले तसेच माथेरानच्या डोंगर कुशीत आजूबाजूला वसलेली शहरे यांना जवळचे ठिकाण म्हणजे रायगडची शान माथेरान ठरले आहे.

येथे पावसाळी आनंद तर काही वेगळाच असतो तीन महिने तर येथील झाडावरून धुक्याची चादर निसर्गाने पसरलेली असते. त्यामुळे पर्यटकही आनंदात असतात. समुद्रसपाटीपासून माथेरानची उंची २६५६ फूट असल्याने साहजिकच खोलवर दऱ्या कपाऱ्या आहेत. पॉईंट वरून दूरवर पाहिले की नदी नाले, डोंगर दऱ्या दिसत असून धबधबे पर्यटकांना आकर्षित करीत असतात अगदी माथेरानच्या पूर्वेस नजर टाकली की नेरळ हे मध्य रेल्वेचे रेल्वे स्टेशन दिसते. त्या ठिकाणी उतरल्यावर लगेच माथेरानचे दर्शन घडते तेथून पर्यायी व्यवस्था म्हणजे नेरळ माथेरान टॅक्सी सर्विस तसेच कर्जत ते माथेरान दरम्यान वेळेनुसार मिनी बस सेवा आहे.हिरव्यागार निसर्गाच्या सानिध्यातून डोंगराच्या वळणदार घाट रस्त्यातून काही कंपनीचे ग्रुप चेकिंग करत पायी येत असतात. माथेरानमध्ये वॉटर पाईप स्टेशनजवळ मोठा धबधबा असल्याने त्याची मजा घेत दस्तुरी या प्रवेशद्वाराजवळून माथेरानला येता येते. माथेरानला आल्यावर महत्त्वाच्या पॉईंटची सहल पर्यटकांसाठी पर्वणीच असून वेगवेगळ्या पॉईंटवरून नयनरम्य दृश्य न्याहाळता येतात पायी भ्रमंती करताना अडचणीचे मार्ग टाळावेत. येथील वनसंपदा व जुलै महिन्यापासून वाहणारा शारलोट लेकचा ओसंडून वाहणारा धबधबा पर्यटकांना ओलेचिंब करण्यासाठी मोहित करीत असतो. एक दिवसाच्या सुट्टीत पर्यटक या लेकच्या धबधब्याचा मनमुराद आनंद लुटत असतात. शनिवारी, रविवारी इको पॉईंट, खंडाळा पॉईंट, बिग चौक पॉईंट, वन ट्री हिल पॉईंट या ठिकाणी तर पर्यटकांची जत्रा भरलेली असते.

### ट्रेकिंगसाठी माथेरान सुरक्षित

**ट्रेकिंगसाठी माथेरान हे सुरक्षित ठिकाण असून माथेरानच्या चारही बाजूंनी ट्रेकिंगसाठी मार्ग आहेत. त्यातील चौक मार्गे वन ट्री हिल पॉईंट हा सर्वात सुरक्षित व ट्रॅकर लोकांच्या आवडीचा रस्ता आहे. तसेच पनवेल मार्गे धोदाणी मार्गे सनसेट पॉईंट हा रस्ता ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांसाठी सुरक्षित रस्ता आहे. त्याचप्रमाणे पेब किल्ला या शिवकालीन गडावरून माथेरान ट्रेकिंगचा रस्ता आहे. माथेरानला येण्याचे झाल्यास सीएसटीवरून कर्जत लोकल असून नेरळ येथे उतरता येते तेथून माथेरानला येण्यासाठी टॅक्सी सर्व्हिस उपलब्ध आहे.**

# अर्थसंकल्प की चेष्टा?

सत्य संकल्पाचा दाता भगवान असतो. लोकशाहीत मतदार, नागरिक हाच भगवान. पण संकल्पांमध्ये लबाडी असेल तर तेही प्रसन्न होणे कठीण. राज्याचे कर्ज सात लाख कोटी झाले आहे आणि आर्थिक वाढीचा वेग खाली येणार आहे याची कबुली आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. या स्थितीत अजित पवारांनी शुक्रवारी जे संकल्प व्यक्त केले त्याच्या सच्चेपणाबाबत शंका घेतली जाणे स्वाभाविक आहे. पुढच्या तीन महिन्यांमध्ये राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे शेतकरी, महिला, गरीब इत्यादींवर सवलतींचा वर्षाव होईल अशी अपेक्षा होती. त्यानुसार अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. मात्र त्या अमलात आणायला पैसे कुठून आणणार हे सांगायला ते विसरले आहेत. अर्थसंकल्प म्हणजे राज्याच्या जमा व खर्चाचा ताळेबंद असतो. रोजच्या खर्चाच्या पलिकडे जाऊन भांडवली गुंतवणूक केली जाणे अपेक्षित असते. या कशाचाही मागमूस दादांच्या अर्थसंकल्पाच्या भाषणात लागत नाही. सरकारच्या अनेक जुन्याच योजनांची जंत्री आणि त्यांच्यासाठी किती तरतूद केली आहे याचे कोट्यवधींचे आकडे यांची भरमार त्यांच्या भाषणात होती. ते ऐकून या नव्याच घोषणा आहेत असा अनेकांचा समज होतो. अलिकडे विविध जाती व समाजात होऊन गेलेले संत, सुधारक, इतिहासपुरुष व स्त्रिया यांच्या नावाने काहीतरी योजना करणे किंवा मग त्यांचे स्मारक उभारणे ही पध्दत रूढ होऊन गेली आहे. अर्थमंत्र्याने आपल्या भाषणात त्यांच्या नावांचा जप करणे हेही आता अनिवार्य बनले आहे. दादांचे भाषण हेही त्याला अपवाद नव्हते. महाराष्ट्रासारख्या तथाकथित श्रीमंत व पुरोगामी राज्यात अर्थसंकल्प सादर करताना किमान गंभीरपणे आर्थिक बाबींची चर्चा व्हायला हवी. मिळकत वाढवण्यातल्या अडचणी, कर्ज इत्यादींविषयी चिंतन हवे. पण दादांचे भाषण म्हणजे निव्वळ निवडणुकांच्या दृष्टीने पाडलेला घोषणांचा पाऊस होता. ते ऐकून हा अर्थसंकल्प की चेष्टा असा प्रश्न कोणालाही पडावा.

### महिलांना खूष करण्याकरिता

या अर्थसंकल्पात महिलांसाठी कोणत्या योजना आखल्या जाणार आहेत याबाबतच्या बातम्या गेल्या दोन दिवसांपासून येत होत्या. किंबहुना त्या सरकारनेच मिडियामध्ये पेरल्या होत्या. त्यामुळे दादांचे भाषण म्हणजे त्यांची केवळ अधिकृत घोषणा होती. मध्य प्रदेशातील लाडली बहेना ही योजना भाजपला विधानसभा निवडणुकांमध्ये खूप यशदायी ठरली असा समज आहे. महाराष्ट्रात त्याचीच कॉपी करण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी लागणारे ४६ हजार कोटी रुपये कोठून उभे करणार याचा खुलासा नाही. याकरिता दुसऱ्या कोणत्या खात्याच्या खर्चांवर कुऱ्हाड पडते हे पाहावे लागणार आहे. याच प्रकारचे आश्वासन काँग्रेसने आपल्या लोकसभा जाहीरनाम्यात दिले तेव्हा मात्र भाजप आणि त्याच्या कह्यात असलेल्या मिडियाने त्यांच्यावर टीका केली होती. शिवाय मतदारांनी निदान मध्य प्रदेशात तरी त्यांना मते दिली नव्हती. गरीब कुटुंबांना वर्षाला तीन सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत. केंद्र सरकारची उज्वला योजना अपयशी ठरल्याची ही अप्रत्यक्ष कबुली आहे. कारण, मोदींनी गॅस कनेक्शन दिले तरी दुसरीकडे सिलेंडरच्या किमती वाढत गेल्याने अनेक गरिबांनी पुन्हा चूल पेटवण्यास सुरुवात केली होती. ५२ लाख कुटुंबांना या योजनेचा फायदा होईल. साडेसात अश्वशक्तीच्या कृषीपंपांचे वीजपंपांना मोफत वीजपुरवठा ही योजना मर्यादित रीत्या स्वागतार्ह आहे. सध्या अवर्षण ते अतिवृष्टी आणि दरातील चढउतार यामुळे गांजलेल्या शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळू शकेल. मात्र, कोरडवाहू किंवा पावसावर अवलंबून असणाऱ्यांना त्याचा फायदा कमी होईल. दुसरे म्हणजे यासाठी चौदा हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. वर्षानुवर्षे ते पैसे कसे उभे होणार हा प्रश्न आहे. मोफत वीज हा सर्वांनाच एक आकर्षक मार्ग वाटतो. पण अंतिमतः सरकार ते पैसे जनतेच्याच खिशातून काढणार असते हे लक्षात ठेवायला हवे. पंजाबातील मोफत विजेमुळे शेतकरी आणि वीज मंडळ या दोहोंचेही मोठे नुकसान झाले आहे.

### सारे काही मतांकरिता

गायीच्या दुधावर लिटरमागे पाच रुपये अनुदान आणि कापूस, सोयाबीन इत्यादी शेतकऱ्यांना हेक्टरी विशिष्ट अनुदान देण्याच्या योजनांबाबतही हेच म्हणता येईल. सध्याच्या काळात त्या रास्त वाटल्या तरी दीर्घ काळात शेतकऱ्यांना आपल्या पायावर उभे करण्यासाठीच सरकारने विचार करायला हवा. मागेल त्याला सौरपंप ही योजना मागेल त्याला शेततळे या धर्तीवर पुन्हापुन्हा उगाळली जाते. प्रत्यक्षात त्याच्या अंमलबजावणीत असंख्य अडचणी आहेत. राजकारणी नेते व त्यांच्या जवळची मंडळी यांनाच त्यांचा लाभ होऊ शकतो. मुंबई, ठाणे व नवी मुंबई येथील डिझेल व पेट्रोल स्वस्त करण्याचा निर्णयही निवडणुकीच्या हिशेबानेच घेतला गेला आहे. याच परिसरात विधानसभेच्या किमान साठ ते सत्तर जागा आहेत. एकेकाळी सरकारी महामंडळे हे चराऊ कुरण होते. आता त्यांचा निधी आटल्याने त्यांच्यावर मरणकळा आली आहे. तरीही यंदा नव्या महामंडळांची घोषणा केली आहे. या महामंडळांना कार्यालयाला जागा आणि माणसे द्यायलाही सरकारकडे पैसे नसतात. मात्र निवडणुकीच्या निमित्ताने असंतुष्ट आमदारांची सोय त्यावर लावता येईल यात शंका नाही. वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापून वारी नावाच्या चांगल्या परंपरेचे सरकारीकरण व राजकीयीकरण होणार आहे. ते घातक आहे. गरीब घरातील मुलींची वैद्यकीय, अभियांत्रिकीसह असंख्य अभ्यासक्रमांची फी माफ करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. यामुळे अधिकाधिक मुली शाळेच्या पुढचे शिक्षण घेतील व त्यांच्या कुटुंबांची स्थिती सुधारेल. बेरोजगारांना भत्ता देण्याचाही निर्णय योग्य आहे. आयटीआय शिक्षित तरुणांना अनुभवाच्या संधीबाबत अनेकदा घोषणा झाल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी महत्वाची आहे. एकूण लोकसभेला ज्यांनी दणका दिला त्या समाजघटकांना आपल्याकडे पुन्हा खेचण्याचा शिंदे-भाजप व राष्ट्रवादीचा हा प्रयत्न दिसतो. येत्या दोन महिन्यात कदाचित शेतकरी कर्जमाफीसारखे निर्णयही घेतले जातील. यामुळे तात्पुरते काही जणांना काही लाभ मिळाले तरी सर्व काही मतांसाठी असे धोरण ठेवून आखलेले हे संकल्प भविष्यात सर्वच मराठी जनतेसाठी घातक आहेत.

---

**विचार**

# ...अखेर प्रियांका मैदानात

***... अखेर प्रियांका गांधी सक्रीय राजकारणात आल्याच! त्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून मैदानात उतरत आहेत. काँग्रेसच्या महासचिव आणि कथित संकटमोचक प्रियांका गांधी-नेहरू परिवारातील संसदीय राजकारणात येणाऱ्या दहाव्या सदस्य आहेत. अलिकडेच उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि काँग्रेस एकत्र आल्याने काँग्रेसची ताकद वाढली आहे. वायनाडमधून प्रियांका गांधींना निवडून आणून काँग्रेस नवा डाव खेळू पहात आहे.***

**राही भिडे**

दोन लोकसभा मतदारसंघातून निवडून आल्यानंतर काँग्रेसचे नेते राहुल गांधी नियमानुसार एका, म्हणजेच वायनाड लोकसभा मतदारसंघातील सदस्यत्वाचा राजीनामा देणार आहेत. ही घटना निश्चितच एका वेगळ्या राजकीय समीकरणाला गती देणारी आहे. आता वायनाड लोकसभा मतदारसंघातून प्रियांका गांधी निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. केरळमधील राजकीय वातावरण पाहता त्या तेथून निवडून येण्यात कोणतीही अडचण नाही. काँग्रेसच्या महासचिव असणाऱ्या आणि संकटमोचक म्हणून काम करणाऱ्या प्रियांका आता प्रत्यक्षात संसदीय राजकारणात येत आहेत. गांधी-नेहरू परिवारातील संसदीय राजकारणात येणाऱ्या त्या दहाव्या सदस्य आहेत. त्या भिस्त ठेवून असणाऱ्या दक्षिण भारतात काँग्रेस प्रबळ होती. उत्तर भारतात तिचे अस्तित्त्व फार नव्हते. मात्र उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि काँग्रेस एकत्र आल्याने या वेळी तेथील जागा वाढल्या आहेत. रायबरेलीची जागा ठेवून वायनाडचा राजीनामा द्यायचा आणि तिथून प्रियांका यांना निवडून आणून दक्षिण आणि उत्तर भारतात काँग्रेसचा पाया अधिक मजबूत करायचा, असा हेतू त्यामागे आहे.

वायनाडची जागा सोडून देशातील सर्वात मोठे राज्य असणारे उत्तर प्रदेश आपलेसे करण्याचा राहुल यांचा प्रयत्न आहे. उत्तर प्रदेशमधील गमावलेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी यापेक्षा दुसरी चांगली संधी नसल्याचे गांधी घराण्याला माहीत आहे. लोकसभा निवडणुकीत 'इंडिया' आघाडीने उत्तर प्रदेशात सर्वोत्तम कामगिरी केली. राहुल गांधींनी वायनाडमधून राजीनामा देण्याची घोषणा केली असली तरी हा निर्णय आधीच घेण्यात आला होता. त्यानंतर झालेली बैठक ही निव्वळ औपचारिकता होती. बैठकीत बहुतांश नेत्यांनी सांगितले की राहुल यांनी दक्षिण भारतात काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मजबूत करण्याचे काम केले आहे. आता उत्तर भारत म्हणजेच एका अर्थी हिंदी पट्टा मजबूत करण्याची वेळ आहे. काँग्रेसला देशात एकहाती सरकार बनवायचे असेल तर ही हिंदी हृदयभूमी जिंकावी लागेल. त्यामुळे राहुल गांधी उत्तर भारताचे नेतृत्व करतील तर प्रियांका दक्षिण भारताचे नेतृत्व करतील, असा निर्णय पक्षाने घेतला. प्रियांका दक्षिणेत गेल्याने लोकांमध्ये काँग्रेसविषयी नाराजीही राहणार नाही. याशिवाय काँग्रेसची तेथील पकडही अबाधित राहण्यास मदत होईल.

गांधी घराण्याच्या आत्तापर्यंतच्या राजकारणावर नजर टाकली तर पक्षप्रमुखांनी नेहमीच अमेठी किंवा रायबरेलीतून देशाचे राजकारण चालवल्याचे दिसते. या दोन्ही जागा कुटुंबासाठी शुभ मानल्या जातात. राहुल दोन ठिकाणांहून निवडून आल्याने कोणत्या जागेचा राजीनामा द्यायचा याबाबत त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला असेल; परंतु पक्षाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सोनिया गांधींनी राहुल यांना वायनाडपेक्षा रायबरेली का महत्त्वाची आहे, हे समजावून सांगितले. उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या ऐंशी जागा असून या राज्यात काँग्रेसचा पाया मजबूत करायचा असेल तर रायबरेलीची खासदारकी महत्त्वाची आहे, हे त्यांचे म्हणणे राहुल गांधींना पटले. मोरारजी देसाई, नरेंद्र मोदी, एच. डी. देवेगौडा असे काही मोजके पंतप्रधान वगळले तर बहुतांश पंतप्रधान उत्तर प्रदेशातील होते. मोदी गुजरातचे असले तरी ते वाराणसीतून निवडून येतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर राहुल गांधींनी वायनाडचा राजीनामा का दिला, हे लक्षात येईल. सोनिया गांधींनी रायबरेलीच्या जनतेला 'मी माझा मुलगा तुमच्याकडे सोपवत आहे' असे म्हटले होते. त्यांचे ते भावनिक आवाहन अत्यंत परिणामकारक ठरले. राहुल यांना रायबरेलीमध्ये वायनाडपेक्षा मोठा विजय मिळाला. अशा परिस्थितीत रायबरेली सोडल्यास उत्तर प्रदेशमध्ये चुकीचा संदेश गेला असता.

इथे हे देखील लक्षात घ्यायला हवे की, गांधी घराण्याच्या प्रमुखाने नेहमीच उत्तर प्रदेशमधून राजकारण केले. राहुल गांधी यांचे वडील राजीव गांधी अमेठीतून तर आजोबा जवाहरलाल नेहरू अलाहाबादमधून निवडणूक लढवत होते. रायबरेली ही त्यांची आई सोनिया, आजी इंदिरा गांधी आणि आजोबा फिरोज गांधी यांची जागा आहे. एकूणच देशाच्या सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातून जातो. उत्तर भारतातील हिंदी भाषिक बहुसंख्य राज्यांमध्ये लोकसभेच्या एकूण ५४३ पैकी ३५० जागा आहेत. २०१९ मध्ये भाजपला येथे १७० पेक्षा अधिक जागा मिळाल्या होत्या आणि या पक्षाने तिथे एकहाती सरकार स्थापन केले होते. या पार्श्वभूमीवर केंद्रात एकहाती सरकार बनवायचे असेल तर हिंदी भाषिक राज्यांमध्ये आणि विशेषतः उत्तर प्रदेशमध्ये पक्ष मजबूत बनवावा लागेल, हा काँग्रेसचा विचार असणे स्वाभाविक आहे, कारण आघाडीच्या बळावर जास्त काळ ते सत्तेवर राहू शकत नाही. या वेळी उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसला ९.४ टक्के मते मिळाली असल्यामुळे ही एक प्रकारे संजीवनीच म्हणावी लागेल, कारण २०१९ मध्ये काँग्रेसला इथे फक्त ६.३६ टक्के मते आणि एक जागा मिळाली होती. दुसरीकडे, २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना २.३३ टक्के मते आणि दोन जागा मिळाल्या होत्या. विरोधी पक्षनेता उत्तर प्रदेशचा असावा, अशी काँग्रेसजनांची इच्छा आहे. राहुल गांधींना संसदेत विरोधी पक्षनेते व्हावे लागेल; अन्यथा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करू, असे खर्गे यांनी म्हटले होते. असे असले तरी राहुल गांधी ते मान्य करताना दिसत नाही. रायबरेलीची जागा कायम ठेवण्यामागील काँग्रेसची एक कल्पना अशीही आहे की विरोधी पक्षनेताही पंतप्रधान निवडून येणाऱ्या राज्याचाच असेल. यामुळे राहुल यांना राष्ट्रीय मीडिया आणि लोकांमध्ये राहण्याची अधिक संधी मिळेल. राहुल गांधी उत्तर प्रदेशमध्ये अधिक सक्रिय झाले तर मोदींशी अधिक स्पर्धा करू शकतील. उत्तर प्रदेशचे प्रश्न सभागृहात मांडू शकतील. यामुळे उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसचा जनसंपर्क आणखी वाढेल तसेच हिंदी भाषिक राज्यांमध्ये काँग्रेस मजबूत होईल. परिणामस्वरुप काँग्रेसचे कार्यकर्ते पुन्हा एकदा नव्या ऊर्जेने आणि उत्साहाने जनतेमध्ये मिसळतील. इतकेच नाही, तर उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांमध्ये काँग्रेस भाजपला पर्याय बनू शकेल. प्रियांका समर्थकांनी राहुल गांधींनी वायनाड सोडू नये आणि प्रियांका गांधींना रायबरेलीतून पोटनिवडणूक लढवू द्यावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु प्रियांका गांधींनी ते मान्य केले नाही. नामांकनाच्या एक दिवस आधी राहुल रायबरेलीतून निवडणूक लढवणार, असे गांधी परिवाराने ठरवले होते. प्रियांका आणि त्यांचे पती रॉबर्ट या दोघांनाही रायबरेलीतून निवडणूक लढवण्याची इच्छा होती. पण पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रियांका यांना घराणेशाहीच्या आरोपामुळे काँग्रेस कमकुवत होईल, असे सांगितले आणि संपूर्ण कुटुंबाने निवडणूक लढवण्याऐवजी राहुल गांधींना ब्रँड करणे आवश्यक असल्याचे पटवून दिले. त्यामुळेच प्रियांका गांधींनी वायनाड मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवण्याचे मान्य केले. वास्तविक, त्यांनी वाराणसीमध्ये मोदी यांच्याविरोधात निवडणूक लढवावी, अशी पक्षाची इच्छा होती. मात्र अखेरच्या क्षणी निर्णय बदलण्यात आला. राहुल यांनी रायबरेलीतील भाषणात याकडे लक्ष वेधले होते.

राहुल गांधी यांनी कन्याकुमारीतून 'भारत जोडो' यात्रेची सुरुवात केली. त्यानंतर दक्षिणेत काँग्रेस सातत्याने मजबूत होत गेली. विशेषतः केरळ, तमिळनाडू आणि कर्नाटकमध्ये पक्षाला चांगला जनाश्रय लाभला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केरळमध्ये २० पैकी १४ तर तमिळनाडू आणि कर्नाटकमध्ये प्रत्येकी नऊ जागा मिळाल्या. आता राहुल गांधींना हिंदी पट्टा मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे परंतु कोणत्याही किंमतीत ते दक्षिण गमावू इच्छित नाहीत. त्यामुळेच राहुल गांधीच्या सांगण्यावरूनच प्रियांका गांधीनी वायनाडमधून पोटनिवडणूक लढवण्यास होकार दिल्याचे सांगितले जाते. प्रियांका गांधी संसदेत पोहोचल्याने काँग्रेसला ऊर्जा मिळेल, यात शंका नाही. आज काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते सभागृहाबाहेर पडले आहेत किंवा त्यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. अशा स्थितीत प्रियांका यांच्या सभागृहात येण्याने पक्षाची विचारधारा अधिक मजबूत होणार आहे. त्या संसदेत पोहोचल्यावर सभागृहात नव्या काँग्रेसची झलक पहायला मिळणार आहे. थोडक्यात, त्यांचे संसदेत येणे हा मास्टर स्ट्रोक असेल. दुसरीकडे, आगामी काळात राहुल गांधींना उत्तर प्रदेशमध्ये आपले नेटवर्क वाढवायचे आहे. ते संपूर्ण राज्यात जनसंपर्क अभियान सुरू करू शकतात. काँग्रेसने निवडणूक लढवलेल्या जागांवर पदयात्रा काढू शकतात. येत्या काळात ते ग्राउंड वर्कवर भर देतील. यामुळे त्यांचा सार्वजनिक संपर्क आणि पक्षाचा पाठिंबा वाढेल.

राहुल आणि प्रियांका उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसचा पाठिंबा वाढवण्यासोबतच अखिलेश यांच्याबरोबरच्या आघाडीची काळजी घेतील. ते अखिलेश यांना लोकसभेत राहुल त्यांच्या शेजारची जागा देऊ शकतात. सध्या समाजवादी पक्ष देशातील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे. साहजिकच राजकीय अवकाश व्यापताना मित्राचे अवकाश कमी होणार नाही, याची दक्षताही त्यांना घ्यावी लागेल.

---

**आजकाल**

# आशा वर्कर व गटप्रवर्तकांचे २ जुलैला मुंबईत आंदोलन

**कल्पना शिंदे**

आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सी आय टी यू) नाशिक तर्फे जिल्हा अध्यक्ष - कॉ. कल्पना शिंदे यांनी सांगितले कि, आशा वर्कर व गटप्रवर्तक भारतातील व राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत महत्त्वाच्या दुवा मानल्या जातात. नागरिकांना आरोग्य सेवा त्यांचे घरापर्यंत उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत असून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित संपूर्ण माहिती सरकारकडे पाठवण्याचे सुद्धा त्या काम करतात. कोरोनाच्या काळात त्यांच्या कार्यामुळे भारतातील आशा वर्कर व गटप्रवर्तक यांच्या प्रयत्नाने व परिश्रमाने जगात नाव लौकिक मिळालेले आहे. त्यांचा वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने सुद्धा सन्मान केला आहे. परंतु कोरोनाचा काळ असो किंवा इतर वेळ असो स्वतःची किंवा स्वतःचे परिवाराची काळजी न करता नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याकरता त्या प्रयत्नात असतात. परंतु शासनाच्या निष्ठुर भूमिकेमुळे आजही त्या वंचित असून शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळवून घेण्याकरता सतत संघर्ष करत असतात. जो त्यांच्या अधिकार आहे.

आशा वर्कर व गटप्रवर्तक यांनी १८ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर पर्यंत संप केल्यानंतर ९ नोव्हेंबर रोजी शासनाने मंजूर केलेल्या मागण्या.

(१) आशा वर्कर यांना ७ हजार रुपये महिना मानधन वाढ.

(२) गटप्रवर्तक यांना १० हजार रुपये मासिक मानधन वाढ.

(३) गटप्रवर्तक यांना कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये समायोजन करण्यात करता कायदा करणार.

(४) आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना २ हजार रुपये दिवाळी बोनस देणार.

(५) आरोग्यवर्धिनीचा निधी सर्व आशांना मेडिकल ऑफिसर यांच्या सहीने देणार.

(६) गटप्रवर्तक यांना आरोग्यवर्धिनीचे १५०० रूपये महिना मोबदला देणार.

(७) ऑनलाइन डाटा एंट्रीची आशांना सक्ती करणार नाही. परंतु ज्या आशा स्वयं इच्छेने करणार त्यांना विशेष मोबदला देणार.

(८) यू एच एन डी नगरपरिषद व नगरपंचायत अंतर्गत असणाऱ्या आशांना लागू नसल्यामुळे त्याच्या निधीपासून सुद्धा

त्यांना मुकावं लागतं. यू एच एन डी सर्वांना लागू करण्यात यावा किंवा यू एच एन डी रद्द करून रक्कम सरसकट

प्रत्येक आशांना देण्यात यावी.

(९) गटप्रवर्तक यांना अंगणवाडी सुपरवायझर प्रमाणे आशा सुपरवायझर संबोधण्यात यावे.

(१०) गटप्रवर्तक यांना त्यांच्या कामानुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या दर्जा देण्यात यावा किंवा काही तांत्रिक अडचणी असल्यास त्यांना कंत्राटी कर्मचाऱ्याप्रमाणे समायोजित करण्यात यावे.

अशा विविध मागण्या मान्य करण्यात आल्या. परंतु त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे परत १२ जानेवारी ते १मार्चपर्यंत ५० दिवस परत बेमुदत संप करण्यात आला. त्यामध्ये २ दिवस मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानासमोर व २० दिवस आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर सुद्धा शासनाने त्याची अंमलबजावणी केली नाही. त्यानंतर आशा वर्कर यांना ५ हजार रुपये महिना व गटप्रवर्तक यांना १ हजार रुपये महिना नोव्हेंबर २०२३ पासून देण्याचा निर्णय शासनाने केला. परंतु नवीन जीआर नुसार मानधन एप्रिल २०२४ ते जून २०२४ महिन्या पर्यंत देण्याचे पत्र पाठवण्यात आले. शासनाने निर्णय घेताना गटप्रवर्तक बाबतीत मोठा अन्याय केलेला आहे. त्या सीनियर असून त्यांना रोज वेगवेगळ्या गावात दौरे करावे लागतात व पूर्ण रेकॉर्ड किपिंग चे काम करावे लागते. त्याकरता त्यांचे विषयावर ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. आशा- गटप्रवर्तक कृती समितीने घेतलेला निर्णय योग्य असून त्यामध्ये फेरबदल करून ९ नोव्हेंबर २०२३ रोजी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता शासनाने करावी. अन्यथा २ जुलै रोजी परत आझाद मैदान येथे गटप्रवर्तकांचे मोठे आंदोलन केले जाईल असे महाराष्ट्र आशा - गटप्रवर्तक कृती समितीने निर्णय घेतलेला आहे.

---

**लोकसंसद**

## राज्य गेले सात लाख कोटीच्या कर्जात

महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनात पहिल्याच दिवशी मांडण्यात आलेल्या आर्थिक पाहणी अहवालात कर्जाबाबत माहिती दिली आहे. त्यानुसार २०२३-२०२४ अखेर महाराष्ट्र राज्यावर कर्जाचा बोजा सात लाख ११ हजार रुपयांहून अधिक आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ सुमारे १३ टक्क्यांनी अधिक आहे. कर्ज वाढल्याने व्याजाची रक्कम सुद्धा वाढली आहे. गेल्या वर्षी ४१ हजार ६८९ कोटी रुपयांचे व्याज भरावे लागले होते. यंदा ही रक्कम ४८ हजार ५७८ कोटीवर गेली आहे. जरी हे कर्ज वाढले असले तरीही ते मध्यम मुदतीच्या वित्तीय धोरणानुसार देशांतर्गत उत्पादनाच्या २५ टक्क्याच्या मर्यादेत आहे. ही काय ती थोडीशी समाधानाची बाब आहे. आता यंदा तर अधिवेशनाचे हे शेवटचे सत्र आहे. त्यानंतर महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. साहजिकच यंदाच्या अधिवेशनात सवलतीची मोठी खैरात पाहावयास मिळणार आहे हे सर्व खर्च करण्यासाठी पैसा कोठून उपलब्ध करणार? हा मोठा प्रश्न आहे. विकासासाठी काही प्रमाणात कर्ज आवश्यक आहे. पण ते मर्यादेतच असावे. आज देशातील कित्येक राज्याची परिस्थिती कर्जामुळे हलाखीची झाली आहे. त्या राज्यांनी सवलतीची मोठी प्रलोभने दाखविली आहेत त्यामुळे सवलती देताना सुद्धा विचार करावयास हवा.

**- शांताराम वाघ, पुणे**

---

**मराठी साहित्यिक दिनविशेष**

**२९ जून**

**१८७१:-** 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे लोकप्रिय महाराष्ट्रगान लिहिणारे कवी, समीक्षक, विनोदी लेखक, नाटककार आणि कथा कादंबरीकार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म. 'गीतोपायन' या काव्यसंग्रहात त्यांचे महाराष्ट्रगीत आहे, तर 'वीरतनय', 'मूकनायक', 'प्रेमशोधन' आदी १२ नाटके. 'दुटप्पी की दुहेरी', 'श्यामसुंदर' या कादंबऱ्या, काही कथा आदी साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१८८४:-** मर्मज्ञ समीक्षक, अनुवादक नारायण महादेव भिडे यांचा जन्म. पेशाने अध्यापक. काव्यचर्चा व साहित्यतोरण या नियतकालिकांचे संपादन करणारे भिडे अर्वाचीन मराठी काव्याचे जाणते पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात. केशवसुत यांची कविता हा त्यांचा अभ्यासपूर्ण लेख. त्यांच्या टिकालेखांचा संग्रह 'काव्यदीपिका' या नावाने प्रसिध्द. तसेच 'प्रवासी' हे एक अनुवादीत पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९०८:-** लेखक आणि होमिओपॅथी, ग्राफालॉजी ह्या शास्त्राचे अभ्यासक यशवंत बळवंत पटवर्धन यांचा जन्म. ह्यांचा 'शब्दकौमुदी' हा मराठीतील 'समशब्दकल्पना शब्दकोश' आणि 'हस्ताक्षरावरुन स्वभाव' हा ह्या विषयावर मराठीतील एकमेव ग्रंथ. **१९१८:-** लेखक, पत्रकार, ग्रंथालयाचे व्यवस्थापक रामचंद्र केशव लेले यांचा जन्म. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथातून त्यांनी मराठी पत्रकारितेचे टप्पे मांडले. ग्रंथवर्णने व ग्रंथसूची ही दोन पुस्तकेही त्यांचीच. **१९२८:-** सामाजिक व ऐतिहासिक कादंबरीकार द्वारकानाथ माधवराव पितळे तथा नाथमाधव पितळे यांचे निधन. वयाच्या अवघ्या २३व्या वर्षी शिकार करताना कडयावरुन कोसळून कायमचे अपंगत्व आल्यावर ते साहित्याकडे वळले. त्यानंतर अवघ्या वीस बावीस वर्षात त्यांनी केलेली साहित्यनिर्मिती थक्क करुन सोडणारी आहे. 'सायंकाळची करमणूक' ते 'भविष्य प्रचिती' मिळून १६ सामाजिक कादंबऱ्या. 'सावळ्या तांडेल' या ऐतिहासिक कादंबरीतून 'आरमार' हा विषय मराठी कादंबरीतून नव्याने रुजू झाला. स्वराज्यमालेतून त्यांनी सात ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. याशिवाय काही नाटके, प्रहसने, 'मास्तरांची दिवाळी', 'संप यशस्वी कोणी केला?' इत्यादी स्फूट गोष्टी आणि काही प्रासंगिक कविताही त्यांच्या नावावर आढळतात. **१९३२:-** संत साहित्याचे अभ्यासक, लेखक डॉ. शंकर किसनमहाराज चतुरकर यांचा जन्म. मराठी संताचा अध्यात्मिक विचार, मुकुंदराज ते रामदास हा त्यांचा पीएचडीचा प्रबंध. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'श्री ज्ञानेवरीचे अभंग', 'तुकोबाची अमृतवाणी', 'तुका आकाशाएवढा', 'ज्ञानेश्वरी दर्पण', 'अमृताचा धनू' अशी ग्रंथसंपदा. **१९३८:-** कथा-कादंबरी, काव्य आदी स्वरुपाचे लेखन करणाऱ्या लेखिका निर्मला श्रीकृष्ण दाते यांचा जन्म. 'राजा चुकूचा' हा बालकथासंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९४०:-** लेखक डॉ. प्रमोद कोलवाडकर यांचा जन्म. ह्यांनी 'आयुरा लेख', 'लाईफ लाईन' हे दोन कथासंग्रह लिहिले. **१९४४:-** स्त्रियांच्या प्रश्नांवर संशोधन व लेखन करणाऱ्या लेखिका छाया दातार यांचा जन्म. 'गोष्टी साधी सरळ', 'वर्तुळाचा अंत' या कथासंग्रहासह 'पुरुष केंद्री', 'मी तरुणी', 'स्वतःला शोधताना', 'स्त्री-पुरुष' अशी स्त्रियांच्या प्रश्नासंबंधीची पुस्तके त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९५४:-** वृत्तपत्रीय स्तंभलेखक, पत्रकार, कथालेखक विलास दत्तात्रय माने यांचा जन्म. चित्रकार, हौशी नाट्य कलाकार असणाऱ्या माने यांचा 'विलासिका' हा काव्यसंग्रह, मु.पो.पोवई नाका हा प्रबोधनपर लेखसंग्रह. 'मांडवझळा' हा ललित लेखसंग्रह. 'सोक्षमोक्ष' हा गुन्हेगारी वरील कथासंग्रह आणि 'स्ट्रीट फायटर' हे आत्मकथन प्रसिध्दीच्या मार्गावर आहे. याशिवाय विविध दिवाळी अंकातून कथालेखन करतात. **१९६६:-** प्राच्यविद्यापंडित, गणितज्ञ, समाज-चिंतक आणि साहित्यिक दामोदर धर्मानंद (डी डी) कोसंबी यांचे निधन. **१९८१:-** मराठी कथेला नवी उंची देणारे, दिगंबर बाळकृष्ण मोकाशी यांचे निधन. 'जरा जाऊन येतो', 'काय रानटी लोक आहेत', 'लामणदिवा','वणवा' आदी ११ कथासंग्रह. 'देव चालले' आणि 'आनंदओवरी' या कादंबऱ्या आणि 'पालखी व अठरा लक्ष पावलं' ही प्रवासस्पंदने त्यांनी लिहिली. 'गुपित अंधारदरीचे' ही किशोरकथाही त्यांचीच आहे. **२०००:-** ऐतिहासिक कादंबरीकार तसेच युध्दविषय लेखक कॅ. वासुदेव श्रीपाद बेलवणकर यांचे निधन. नाना फडणीसांच्या जीवनावर 'शर्तीने राज्य राखावे' ही कादंबरी तसेच 'अटकेत रोविले झेंडे' ही बाळाजी विश्वनाथ व पहिला बाजीरावावर आणि 'कळस चढविला मंदिरी' ही नानासाहेब पेशव्यांवर तसेच 'असे हेर अशा कथा', 'मायावी मुखवटे' ही पुस्तके 'बहिरा ससाणा' हा कथासंग्रह. अशी त्यांची साहित्य संपदा आहे. **१९९३ :** कथालेखक, समीक्षक, भाषाभ्यासक वसंत कृष्णा वऱ्हाडपांडे यांचा जन्म १९ डिसेंबर १९२७ रोजी झाला. नागपूर विद्यापीठातून एम. एची पदवी संपादन केल्यावर काही काळ शिक्षक तसेच मध्यप्रदेश सरकारच्या भाषाविभागात अनुवादक म्हणून काम केले. पुढे नागपूरच्या हिस्लॉय महाविद्यालयात मराठीचे अध्यापन केले. १९४८ साली प्रसाद मासिकाच्या क्थास्पर्धेत त्यांना दुसरे पारितोषिक मिळाले. तत्पूर्वी त्यांनी लेखनाला सुरुवात केली होती. 'वास्तू' व 'उत्सव' या संग्रहात त्यांच्या कथा समाविष्ट झाल्या आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# बांधलेल्या कचराकुंड्या गायब

**। उरण । वार्ताहर ।**

चाणजे ग्रामपंचायतने काही महिन्यांपूर्वी लाखों रुपये खर्च करून अनेक ठिकाणी कचरा कुंड्या उभारल्या होत्या. त्यातील काही कचराकुंड्या गायब होऊन त्याठिकाणी वृक्षलागवड करण्यात आली. यावरून ग्रामपंचायतीचे लाखो रुपये पाण्यात गेल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. याला जबाबदार कोण? याचे उत्तर ग्रामसेवक यांनी जनतेला द्यावे, अशी मागणी चाणजे ग्रामस्थांकडून केली जात आहे.

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायतीमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. त्याबद्दल अनेक तक्रारी अर्ज दाखल होऊनही आजतागायत कोणतीच कारवाई अथवा चौकशी करण्याऐवजी तक्रारी अर्ज निकाली काढण्याचे प्रताप अधिकाऱ्यांना केल्याची चर्चा आहे. यामुळे एका ग्रामविकास अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आल्याचे कळते. त्यांचे निलंबन रद्द करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी चर्चा आहे. यावरून शेतच कुंपणच खात असेल तर दाद कुणाकडे मागायचे, असा सवाल उपस्थित होतो.




करंजा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करून अनेक ठिकाणी विकासकामे केल्याचा डांगोरा पिटला जातो. परंतु, माहितीच्या अधिकारात त्याची माहिती मागितली असता माहिती दिली जात नसल्याचे तक्रारदार सांगतात. काही महिन्यांपूर्वी अनेक ठिकाणी लाखो रुपये खर्च करून कचऱ्याकुंड्या बांधण्यात आल्या होत्या. त्यातील काही कचराकुंड्या गायब झाल्या आहेत. कचराकुंड्या उभारताना कोणतीही अधिकृत परवानगी न घेता शासकीय जागेवर कचराकुंड्या उभारल्याचे बोलले जाते. जर अशा प्रकारे लाखों रुपये खर्च करून उभारलेल्या कचराकुंड्या गायब होऊन हा पैसा वाया गेला याला जबाबदार कोण, याबाबत विचारणा केली असता ग्रामविकास अधिकारी अथवा इतर वरिष्ठ अधिकारी माहिती देण्याऐवजी चौकशी सुरू असल्याचे सांगून वेळ मारून नेतात. तरी जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची हिंमत दाखवतील का, असा सवाल करंजा ग्रामस्थांकडून केला जात आहे.

## शासकीय मुकबधिर विद्यालयात प्रवेश मोफत

**। रायगड । वार्ताहर ।**

शासकीयमुकबधिरविद्यालय, विद्यानगर, अलिबाग येथे मोफत प्रवेश देणे सुरु करण्यात आले असून, ०६ ते १६ वयोगटातील मुला-मुलींच्या इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी अधीक्षक, शासकीय मुकबधिर विद्यालय, विद्यानगर-अलिबाग, जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांनी केले आहे.

रायगड जिल्हा व कोकण विभागातील कर्णबधिर मुला-मुलींच्या शिक्षणाच्या सोयीसाठी शासनाने विद्यानगर-अलिबाग येथे शासकीय मुकबधिर विद्यालय सुरू केले आहे. या संस्थेत ०६ ते १६ वयोगटातील मुकबधिर मुला-मुलींसाठी इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंतचे मोफत शिक्षण देण्यात येते. प्रवेशित मुला-मुलीसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था आहे. भोजन, वह्या, पुस्तके व शैक्षणिक साधने आदी सुविधा विनामूल्य पुरविण्यात येतात. अधिक माहितीसाठी श्री. शिंदे (प्र.अधीक्षक) ९५९४३१३१७९, श्री. वेखंडे ७०३०३९००२०, श्री. बोरकर ९९७०५२५३४५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Panvel**
**SRM e-Tender Notice No. 02/2024-25**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 15/2024-25 | 7000031780 | Providing services of 6 nos of skilled labour at EHV CCCM DN Panvel, EHV CCCM Sub-Dn Panvel, Kharghar, Kalyan at EHV CCCM Dn Panvel for FY 2024-25.(01.07.2024 to 31.03.2025) (IInd call) | 1457341.00 |
| 16/2024-25 | 7000031781 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Kalyan (Annual Contract) for the year 2024-25. (01.07.2024 to 31.03.2025) (IInd call) | 444347.00 |
| 17/2024-25 | 7000031730 | Annual civil maintenance works at 220KV ONGC, 100KV Jite,100KV Patalganga,100KV Bhokarpada, Takka premises, Kalamboli Colony, Bhingari premises and 220KV Wadkhal for F.Y.2024- 25. (IInd call) | 2230961.00 |
| 18/2024-25 | 7000031732 | Annual civil maintenance works for Nerul/Uran/Taloja-I & Taloja-II substations along with colony with other civil works for F.Y 2024-25. (IInd call) | 2008525.00 |
| 19/2024-25 | 7000031733 | Annual civil maintenance works for 400KV Kharghar substation along with other civil works for the F.Y 2024-25. (IInd call) | 2043589.00 |
| 20/2024-25 | 7000031734 | Annual civil maintenance works for Roha/Mahad/100KV Thal substation Mhasala colony along with colony other civil works for F.Y 2024-25. (IInd call) | 2073410.00 |
| 21/2024-25 | 7000031735 | Annual civil maintenance works for Wasamabe Colony/ 220KV Apta/200KV Tambati/100KV Khopoli S/stn along with colony with other civil works for F.Y 2024-25. (IInd call) | 1999441.00 |
| 22/2024-25 | 7000031731 | Annual civil maintenance contract for 400KV Nagothane Substation civil works for year FY 2024-25. (IInd call) | 1604702.00 |
| 23/2024-25 | 7000031736 | Annual civil maintenance contract for 220KV Kandalgaon substation with colony and 220KV Vilebhagad substations for civil works for year FY 2024-25. (IInd call) | 1710948.00 |
| 24/2024-25 | 7000031715 | Providing and fixing false ceiling and sun control film for control room building at 400KV Nagothane. | 2316819.23 |
| 25/2024-25 | 7000031831 | Annual civil maintenance contract for Dombivali, Dombivali Pal, Morivali, Anandnagar, Jambhul, Neral, Palava substation, colony, offices under Kalyan S/Dn for year 2024-25. (IInd call) | 2038754.00 |
| 26/2024-25 | 7000031830 | Annual civil maintenance contract for Mohane, Murbad, Shahapur, Technocraft Murbad, Centuryreon Ulhasnagar Jindal Vashind substation, colony,offices under Kalyan S/Dn for year 2024-25. (IInd call) | 2038754.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: *www.mahatransco.in.*
Contact person: Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325

Sd/-
**Executive Engineer (Civil), Panvel**

## चाणजे ग्रामपंचायतीचे लाखो रुपये वाया

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालकांकडुन कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७४ | १२ | ०-४४-०० | ०=२१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, करार, तावा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: २८/०६/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. किशोर बाबु आसवले यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९३ | २ ब | ०-५३-३० | ०=४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २८/०६/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सुधीर गंगाधर सोनावळे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ९३ | २अ | ०-५३-३३ | ०=४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. अरो समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २८/०६/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अलमेडा जेरी एलियास यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कोंदिवडे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २०/२/ब/२ | एकुण ०-२१-०० हे आर पॉ | १-६६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हवक हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### लिपिक व शिपाई नेमणे आहे

सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अलिबाग डोंगरे हॉल अलिबाग या सार्वजनिक जिल्हा अ वाचनालयात लिपिक टंकलेखन व शिपाई या एक एक पदाची सरळसेवा पद्धतीने कायमस्वरूपी नेमणूक करावयाची आहे.

अधिक माहितीसाठी दिनांक १ ते १० जुलै पर्यंत कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तसेच दिनांक १२ जुलै रोजी संध्याकाळी ५ वा. मूळ कागदपत्रे घेऊन मुलाखतीकरीता उपस्थित रहावे.

**लिपिक १ पद -**
१. शैक्षणिक पात्रता १२ वी उत्तीर्ण
२. टंकलेखन पात्रता मराठी ३०, इंग्रजी ३०
३. वय शासकीय नियमानुसार
४. ग्रंथपाल प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आवश्यक

**शिपाई १ पद -**
१. शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण

टिप - कर्मचारी निवडीबाबतचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अलिबाग यांच्याकडे राखीव असतील.

सही/-
**अध्यक्ष**
**सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अलिबाग**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चेंढरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड सर्व्हे नंबर १२. हि.नं. ३ या मिळकतीमधील बिनशेती प्लॉट नं. १. एकूण क्षेत्र ४७६.९५ चौ.मी. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''कमळ कुंज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. '' शिवाजीनगर चेंढरे हया इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. २०१, (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. १४४०/७) क्षेत्र ७६० चौ.फुट बिल्टअप (७०.६३ चौ.मी.) ही निवासी सदनिका विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीवर भारतीय स्टेट बँक अलिबाग यांचेव्यतिरिक्त अन्य कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहित लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसलेही प्रकारचा हक्क-हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व तो तुमच्यावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत न आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २८.६.२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं.९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे निगुडशेत, ता. तळा, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरविले असून या मिळकतीबाबत मिळकतींच्या मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचा काही हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोटगी, निवाडा, भाडेपट्टा अगर अन्य प्रकारे हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसात खाली सही करणार यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात, या मुदतीत हरकती न आल्यास मिळकती निर्वेध असल्याचे समजून या मिळकतींबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. करिता जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

अ) मिळकतीचे वर्णन
मौजे निगुडशेत, ता. तळा. जि. रायगड येथील मिळकत, तिचे वर्णन खालीलप्रमाणे,

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|
| ३८८ | १-२७-००<br>पो.ख.०-२९-००<br>१-५६-००<br>पैकी ०-६०-०० | ०.५२ |

माणगांव,
दिनांक २८/०६/२०२४

सही/-
**ॲड. राहुल प्र.ओके**
'मानस', मुंबई गोवा हायवे
पो. ता. माणगांव, जि. रायगड.
मो.नं. ८८८८३७३००५
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक दिपक रावजी लेकुरवाला व इतर ३ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे-गौळवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १९/२ | एकुण ०-७१-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे हिश्याचे एकुण क्षेत्र ०-५४-०० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-३८-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ५-७२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लोज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)

ज. म. र अर्ज १०३ /२०२४

जाहिर नोटीस

नजमा महमद शफी उल्डे,
रा. मु. पो. विहूर, — अर्जदार
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नजमा महमद शफी उल्डे, यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९६० रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार नजमा महमद शफी उल्डे, हिचा दिनांक ०१/०६/१९६० रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि.१६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता ११/०६/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा,**

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)

जू. म. र अर्ज १०५/२०२४

**जाहिर नोटीस**

श्रीम. नसिम हसन कादीरी,
लग्नानंतरचे नाव नसिम सईम महम्मद गिरे,
रा. मु. पो. मजगाव,
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड. — अर्जदार
सद्या रा. मु. पो. ता रोहा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम, नसिम हसन कादीरी, लग्नानंतरचे नाव नसिम सईम महम्मद गिरे, यांचा जन्म दिनांक ०२/०१/१९७५ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे मजगाव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगाव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार श्रीम, नसिम हसन कादीरी, लग्नानंतरचे नाव नसिम सईम महम्मद गिरे, यांचा दिनांक ०२/०१/१९७५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
दिली.
आज ता. ११/०६/२०१४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड - जंजिरा,**

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)

ज म र अर्ज /२०२४

**जाहिर नोटीस**

खुर्शीद मेहमुद दामाद
रा. मु. दरबारोड मुरूड, — अर्जदार
पो. ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव,
ता. मुरुड, जि. रायगड. — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार खुर्शीद मेहमुद दामाद, हिचा जन्म दिनांक १८/१०/१९७५ रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे दरबार रोड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगाव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार खुर्शीद मेहमुद दामाद हिचा दिनांक १८/१०/१९७५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.१६/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता ११/०६ /२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**( रोहन शिंदे )**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)

ज. म. र अर्ज १०४/२०२४

**जाहिर नोटीस**

नबिल जहूर उलडे,
रा. मु. पो. विहूर, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहूर — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नबिल जहूर उलडे, यांचा जन्म दिनांक ०५/०६/१९८२ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार नबिल जहूर उलडे, हिचा दिनांक ०५/०६/१९८२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.१६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.११/०६/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

निवडक

### फ्रँक डकवर्थ यांचे निधन

**लंडन :** डीएलएस मेथड... हा शब्द क्रिकेट सामन्यांदरम्यान अनेकदा ऐकला असेल. पावसामुळे प्रभावित झालेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांचे निकाल निश्चित करण्यासाठी याचा वापर केला जातो. ही पद्धत शोधणाऱ्या फ्रँक डकवर्थ यांचा मंगळवारी मृत्यू झाला. इंग्लंडचे सांख्यिकीशास्त्रज्ञ डकवर्थ यांनी टोनी लुईससह १९९७ मध्ये ही पद्धत शोधून काढली, झिम्बाब्वे आणि इंग्लंड यांच्यातील सामन्यात १ जानेवारी १९९७ रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने प्रथमच स्वीकारली होती.

### ‘ यंदा ट्रॉफी आपलीच’

**इंग्लंड :** भारताने इंग्लंडविरुद्ध सेमीफायनलममध्ये बाजी मारत फायनलमध्ये दिमाखात प्रवेश मिळवला. रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडसमोर तगडं आव्हान उभं केलं होतं. भारतीय गोलंदाजांनीही उत्कृष्ट बॉलिंगच्या जोरावर इंग्लंडला गुडघे टेकायला लावलं. भारताने सेमीफायनल जिंकताच बॉलिवूड सेलिब्रिटींनी अभिनंदनाचा वर्षाव केला.अजय देवगण आणि आयुष्मान खुराना या दोघांनी ‘यंदा ट्रॉफी आपलीच’ असे कौतुक केले आहे.

### चाहत्यांना धोनीची आठवण

**इंग्लंड :** टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघाने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात कमाल दाखवली. संघाच्या खेळाडूंनी प्रत्येक क्षेत्रात चमकदार कामगिरी केली. या सामन्यातील ऋषभ पंतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल आहे. धोनीचा शिष्य असलेल्या ऋषभ पंतमध्ये पण माहीच्या कौशल्याची चमक दिसत आहे. या व्हिडीओतील ऋषभ पंतच्या अप्रतिम क्षेत्ररक्षणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

### रोहितने रचला इतिहास

**इंग्लंड :** टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचताच रोहित शर्माने एमएस धोनीला एका खास विक्रमात मागे टाकले आहे. टीम इंडियाला तिन्ही फॉरमॅटमध्ये आयसीसी टूर्नामेंटच्या अंतिम फेरीत पोहोचवणारा तो भारताचा पहिला कर्णधार ठरला आहे. बाबर आझमलाही टाकले मागे रोहित शर्माचा कर्णधार म्हणून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हा ४९ वा विजय आहे. यासह टी-२० आंतरराष्ट्रीय सर्वाधिक सामने जिंकणारा कर्णधार बनला आहे. त्याने बाबर आझमचा विक्रम मोडला आहे.

### ‘बुमरा चांगला गोलंदाज’

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचे महान कर्णधार व दिग्गज अष्टपैलू खेळाडू कपिल देव यांनी टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराच्या गोलंदाजीचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले, जसप्रीत बुमरा हा माझ्यापेक्षा हजारपट अधिक चांगला गोलंदाज आहे. मी फॉर्ममध्ये असताना ज्याप्रकारे गोलंदाजी करायचो, त्यापेक्षा कईकपट छान गोलंदाजी तो करतो. बुमराहसह सर्व गोलंदाज धडाकेबाज कामगिरी करीत आहेत. अशी स्तुतीही कपिल देव यांनी केली.

# ‘साहेब’ चारी मुंड्या चित

**। गयाना । वृत्तसंस्था ।**

**टी-२० विश्वचषकाची दुसरी उपांत्य फेरी भारत आणि इंग्लंड यांच्यात गयाना येथे पार पडली. भारताने रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर ७ गडी गमावत १७१ धावा केल्या. यानंतर अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडला चारी मुंड्या चित केले.**

- **भारत दिमाखात अंतिम फेरीत**
- **घेतला २०२२ च्या पराभवाचा बदला**



भारताने इंग्लंडला १०३ धावांवर बाद करत ६८ धावांनी विजय मिळवत अखेर २०२२ च्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत झालेल्या पराभवाचा बदला घेतला. भारताने तब्बल दहा वर्षांनी दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. याआधी भारताने २०१४ साली अंतिम फेरी गाठली होती. आता भारताची शनिवारी (दि.२९) दक्षिण आफ्रिकेविरुद्ध लढत होणार आहे. दरम्यान, पावसामुळे हा सामना उशिराने सुरु झाला. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने अनाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरलेले भारताचे सलामीवीर रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनी भारताच्या डावाची सुरुवात केली. रोहित शर्माने ऑस्ट्रेलिया विरुद्ध आक्रमक फलंदाजी केली होती. आज मात्र, गयानातील परिस्थितीशी जुळवून घेत रोहितने संयमी फलंदाजी केली. विराट कोहलीने टॉप्ली याला षटकार मारल्यानंतर जोरदार फटका मारण्याच्या प्रयत्नात ९ धावा काढून बाद झाला. रिषभ पंत देखील केवळ ४ धावा करुन बाद झाला. यानंतर रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव या दोघांनी महत्त्वाची भागिदारी केली. रोहित शर्माने कर्णधार पदाला साजेशी खेळी करत ५७ धावा केल्या. सूर्यकुमार यादवने देखील ४७ धावांची खेळी केली. हार्दिक पांड्याने २३ धावा करत इंग्लंडच्या गोलंदाजांवर दबाव आणला. शिवम दुबे शून्यावर बाद झाला.

रवींद्र जडेजाने १७ तर अक्षर पटेलने १० धावा केल्या. तर, इंग्लंडकडून जॉर्डन याने ३ बळी घेतले. भारताने इंग्लंडपुढे १७२ धावांचे आव्हान ठेवले होते. अक्षर पटेलने जोस बटलरच्या रुपात भारताला पहिला बळी मिळवून दिला. बटलरने २३ धावा केल्या. जसप्रीत बुमराहने फिल सॉल्टला बाद करत दुसरा धक्का इंग्लंडला दिला. इंग्लंडच्या डावाच्या सहाव्या षटकाच्या पहिल्या बॉलवर अक्षर पटेलने जॉनी बेयरस्टोला शून्यावर बाद करून तिसरा धक्का दिला.

अक्षर पटेल याच्या गोलंदाजीवर इंग्लंडने आणखी एक बळी गमावला. मोईन अली रिषभ पंतच्या सतर्कतेने यष्टीचीत बाद झाला. कुलदीप यादवने सॅम करनचा बळी घेत इंग्लंडला मोठा धक्का दिला. हॅरी ब्रुकने २५ धावा करत इंग्लंडच्या डावाला सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, एकदा जीवदान मिळून देखील तो कुलदीप यादव पुढे टिकू शकला नाही. कुलदीपने ब्रुकचा त्रिफळा उडवला. कुलदीप यादवने ख्रिस जॉर्डनला १ धावेवर बाद करत इंग्लंडला आणखी एक धक्का दिला. जसप्रीत बुमरहाने इंग्लंडचा शेवटचा बळी घेत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

### हिटमॅनची कर्णधाराला साजेशी खेळी

*हिटमॅन रोहित शर्माने कर्णधाराला साजेशी फलंदाजी केली. रोहितने पहिल्या चेंडूपासून आपला आक्रमक अंदाज दाखवला. सूर्यकुमार सोबत रोहितने अर्धशतकी भागिदारी करत भारताच्या डावाला आकार दिला. त्याने ३९ चेंडूमध्ये ५७ धावांची खेळी केली. या अर्धशतकी खेळीला दोन षटकार आणि सहा चौकारांचा साज होता.*

## उत्तेजक चाचणी अधिकाऱ्यांची करडी नजर

**। पंचकुला । वृत्तसंस्था ।**

हरियाना येथील पंचकुला येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय आंतरराज्य अजिंक्यपद स्पर्धेत खेळाडूंचा कस लागणार आहे. नवी दिल्ली येथून राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेतील (नाडा) ३० पेक्षा जास्त उत्तेजक नमुना चाचणी अधिकारी येथे आले असून त्यांच्याकडून विशिष्ट खेळाडूंची उत्तेजक नमुना चाचणी घेण्यात येणार आहे,

एका उत्तेजक नमुना चाचणी अधिकाऱ्याकडून याप्रसंगी स्पष्ट करण्यात आले की, पॅरिस ऑलिंपिकआधीची ही ॲथलेटिक्समधील सर्वात मोठी स्पर्धा आहे. मोठ्या संख्येने आमचे अधिकारी येथे पोहोचले आहेत. काही विशिष्ट खेळाडूंच्या उत्तेजक चाचण्या घेण्यात येणार आहेत. मी आता अधिक काही सांगू शकत नाही.

दरम्यान, गुरुवारी सकाळी ज्या खेळाडूंच्या लढती पार पडल्या, त्या



खेळाडूंच्याही चाचण्या करण्यात येणार आहेत. तसा करारही करण्यात आला आहे.

नाडाचे अधिकारी स्पर्धा सुरू होण्याआधी एक दिवस अर्थातच बुधवारी येथे दाखल झाले. स्पर्धेच्या काळामध्ये खेळाडूंची उत्तेजक चाचणी करण्यात आली नाही, पण नाडाचे अधिकारी दाखल झाल्यानंतर बुधवारी काही खेळाडूंची उत्तेजक चाचणी घेण्यात आली असावी. तेजस्वीन, सर्वेश अंतिम फेरीत पुरुषांच्या उंच उडी प्रकारात तेजस्वीन शंकर, सर्वेश कुशारे यांनी अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला. तेजस्वीन याने पात्रता फेरीत पहिला, तर सर्वेश याने दुसरा क्रमांक पटकावला. दोघांनीही २.१० मीटर उंच उडी मारली.



## स्मृती अन् शफालीची दमदार सलामी

**९० वर्षांच्या इतिहासात रचला इतिहास**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघाची सलामी जोडी स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी महिला कसोटी क्रिकेटमध्ये मोठा इतिहास रचला. दक्षिण आफ्रिकेविरूद्ध सुरू असलेल्या एकमेव कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी या दोघींनी २५० धावांची दमदार सलामी देत विश्वविक्रम केला. महिला कसोटी क्रिकेटच्या ९० वर्षाच्या इतिहासात कोणत्याही सलामी जोडीला पहिला विकेटसाठी २५० धावांची सलामी देता आली नव्हती. मात्र स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी हा इतिहास घडवला.

भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट संघात सुरू असलेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर होत असलेल्या या सामन्यात भारताच्या सालमी जोडीनं दमदार सुरूवात केली. स्मृती मानधना आणि शफली वर्मा यांनी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांना पहिल्या दोन सत्रातच जेरीस आणलं. या दोघींनी आक्रमक फलंदाजी करत २९२ धावांची खणखणीत सलामी दिली. यात स्मृती मानधनाचे १४९ धावांचे योगदान राहिले. तिचे दीडशतक अवघ्या एक धावेने हुकले. दुसरीकडे शफाली वर्माने १५० धावा करत आपलं पहिलं वहिलं कसोटी शतक मोठं केलं. सामन्याच्या पहिल्या दिवशीचे दुसरे सत्र संपवण्यापूर्वी भारताने ५६ षटकात १ बाद ३१२ धावांपर्यंत मजल मारली होती. शफाली वर्मा १६६ चेंडूत १५५ धावा करून नाबाद होती. तर शुभा सतीशने १२ चेंडूत ६ धावा केल्या होत्या. स्मृतीच्या कसोटीतील ५०० धावा देखील पूर्ण स्मृती मानधनाने कसोटीतील आपल्या ५०० धावा देखील पूर्ण केल्या. विशेष म्हणजे भारताकडून कसोटी क्रिकेटमध्ये ५०० धावा करणारी स्मृती ही फक्त दुसरी बॅटर आहे. यापूर्वी भारताची माजी कर्णधार मिताली राजने अशी कामगिरी केली होती. स्मृतीने मितालीचा अजून एक विक्रम मोडला. कसोटी क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम मितालीच्या नावावर होता. तिने ८७ चौकार मारले होते. तो विक्रम आता स्मृतीच्या नावावर असून तिचे कसोटीत ९० चौकार झाले आहेत.

## माहीच्या ‘हेअर स्टाईल’ने वेधले लक्ष

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने भलेही क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असेल, पण त्याची खास शैली आणि लूक त्याला चर्चेत ठेवतात. आता एक अतिशय लोकप्रिय हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये माहीने त्याचे लांब केस कापलेले दिसत आहेत. ज्यामुळे धोनीला एक नवीन आणि मस्त लूक मिळाल्याचे दिसत आहे. काही काळापूर्वी आयपीएल २०२४ मध्ये धोनी लांब केसांच्या लूकमध्ये खेळताना दिसला होता, परंतु आता नवीन हेअरकटमुळे धोनी एखाद्या मॉडेलपेक्षा कमी दिसत नाही. हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने धोनीच्या फोटोसोबत कॅप्शनमध्ये लिहिले, ‘‘आमचा तरुण, डायनॅमिक आणि देखणा महेंद्रसिंग धोनी. थालाचे हेअर स्टाईल करणे हा एक आनंददायी अनुभव आहे. धोनी नेहमीच इतका विनम्र असतो की तो मला फोटो काढायला कधीच मनाई करत नाही.’’

# व्हेनेझुएलाचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धा**

**। इंगलवूड । वृत्तसंस्था ।**

व्हेनेझुएलाने आपली विजयी लय कायम राखताना मेक्सिकोला १-० अशा फरकाने नमवत कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले. सामन्यातील एकमेव गोल ५७व्या मिनिटाला कर्णधार सालोमोन रोन्डोन याने पेनल्टीच्या माध्यमातून केला.

व्हेनेझुएलाने आपल्या पहिल्या सामन्यात इक्वेडोरला २-१ अशा फरकाने पराभूत केले होते. त्यामुळे ‘ब’ गटात ते किमान दुसऱ्या स्थानी राहणार हे निश्चित झाले आहे. ते आपला अखेरचा सामना रविवारी जमैकाविरुद्ध खेळणार आहेत. जमैकाचा संघ यापूर्वीच बाद फेरीत पोहोचण्याच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.

मेक्सिकोने जमैकाला १-० असे पराभूत करत सुरुवात केली होती. त्यांचे इक्वेडोर इतकेच तीन गुण आहेत. मेक्सिकोला



आपला अखेरचा सामना रविवारी इक्वेडोरशी खेळायचा आहे. या सामन्यातील विजेता संघ उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवेल.

त्यापूर्वी, गुरुवारी झालेल्या सामन्याच्या मध्यंतरापर्यंत मेक्सिकोने व्हेनेझुएलाला रोखून धरले होते. मात्र, दुसऱ्या सत्रात त्यांनी गोल करत मेक्सिकोच्या अडचणी वाढवल्या. यानंतर व्हेनेझुएलाने भक्कम बचाव करताना अखेरपर्यंत मेक्सिकोला गोल करण्याची संधी दिली नाही.

**इक्वेडोरची जमैकावर मात**

अन्य सामन्यात इक्वेडोरने जमैकावर ३-१ अशा फरकाने विजय नोंदवला. इक्वेडोरचा २०१६ नंतर कोपा अमेरिका स्पर्धेतील हा पहिलाच विजय ठरला. यापूर्वी, पहिल्या सामन्यात त्यांना व्हेनेझुएलाकडून पराभूत व्हावे लागले होते. जमैकाच्या केसी पाल्मरकडून झालेल्या स्वयंगोलमुळे इक्वेडोरला आघाडी मिळाली. यानंतर पहिल्या सत्राच्या भरपाई वेळेत केंड्री पाएझने गोल करत इक्वेडोरला २-० असे आघाडीवर नेले. उत्तरार्धात जमैकाच्या मिखाइल अँटोनिओने गोल करत आघाडी कमी केली. मात्र, भरपाई वेळेत ॲलन मिंडाने गोल केल्याने इक्वेडोरने सामना ३-१ असा जिंकला.

## तब्बल अकरा गोलांचा पाऊस

**पुणे :** हॉकी पुणे लीग २०२४-२५ च्या वरिष्ठ विभागीय गटात मंगळवारी मध्य रेल्वे आणि फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्यातील तब्बल ११ गोलांची नोंद झाली. त्यात रेल्वेने प्रतिस्पर्ध्यांवर ६-५ अशी मात केली.नेहरूनगर-पिंपरी येथील मेजर ध्यानचंद स्टेडियमवर सुरू असलेल्या स्पर्धेत दिवसातील शेवटच्या सामन्यात राज पाटीलने एफसीआयचे खाते उघडले. त्यानंतर तीन गोल करताना मध्य रेल्वेने आघाडी घेतली. विशाल पिल्ले, प्रज्वल मोरकर आणि स्टीफन स्वामी यांचे त्यात मोलाचे योगदान राहिले.आकाश पवार, मनप्रीत सिंगच्या गोलमुळे एफसीआयने दमदार पुनरागमन करताना ३-३ अशी बरोबरी साधली. त्यानंतर मध्य रेल्वेकडून अनिकेत मुथिया, विशाल पिल्ले आणि स्टीफन स्वामीने गोल करताना टीमला ६-३ अशी आघाडी मिळवून दिली.

## किरणची रेकॉर्ड ब्रेक कामगिरी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

किरण पहल ही ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारताची सर्वात वेगवान महिलापटूंपैकी एक ठरली आहे. २४ वर्षाच्या किरणने राष्ट्रीय आंतरराज्यीय स्पर्धेत रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे.



पंचकुला येथे झालेल्या स्पर्धेत तिने ४०० मिटर धावण्याची स्पर्धा ५०.९२ सेकंदात पूर्ण केली. भारताच्या हिमा दासने ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत ५०.७९ सेकंद वेळ नोंदवली होती. आता किरण भारतीची दुसऱ्या क्रमांकाची धावपटू ठरली आहे. या कामगिरीमुळे किरण ही पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र झाली आहे. या पात्रतेसाठी तुम्हाला ४०० मीटर धावण्याची स्पर्धा ही ५०.९५ सेकंदात पूर्ण करावी लागते. अशी कामगिरी करणारी ठरली दुसरी महिलाहिमा दासनंतर, किरण पहल ४०० मीटरमध्ये ५१ सेकंदापेक्षा कमी वेळ नोंदावणारी दुसरी भारतीय महिला ठरली आहे.

# जॉर्जियाचा पोर्तुगालला धक्का

**युरो फुटबॉल स्पर्धा**

**। गेल्सेनकिर्चेन । वृत्तसंस्था ।**

ख्रिास्तियानो रोनाल्डोला आदर्श मानणाऱ्या आक्रमकपटू खविचा क्वारात्सखेलियाच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर जॉर्जियाने युरो अजिंक्यपद फुटबॉलस्पर्धेतीलअखेरच्यासाखळी सामन्यात धक्कादायक निकालाची नोंद करताना रोनाल्डोच्याच पोर्तुगालवर २-० असा विजय मिळवला. या विजयासह जॉर्जियाच्या संघाने बाद फेरीत प्रवेश केला.



पोर्तुगालचे बाद फेरीतील स्थान आधीच निश्चित असल्याने या सामन्यासाठी प्रशिक्षक रोबर्टो मार्टिनेझ यांनी राखीव फळीतील खेळाडूंना संधी देण्याचा निर्णय घेतला. गेल्या सामन्यात तुर्कीवर विजय मिळवणाऱ्या पोर्तुगाल संघातील केवळ तीन खेळाडूंचे स्थान जॉर्जियाविरुद्धच्या सामन्यासाठी कायम राहिले. यात कर्णधार आणि तारांकित आघाडीपटू रोनाल्डोचाही समावेश होता. मात्र, रोनाल्डोला सलग तिसऱ्या सामन्यात गोल करण्यात अपयश आले. पूर्वार्धात त्याने पेनल्टीसाठी अपील केले, पण पंचांनी त्याला दाद दिली नाही. पोर्तुगालच्या अन्य खेळाडूंनाही फारशी चमक दाखवता आली नाही.

याउलट बाद फेरी गाठण्यासाठी विजय अनिवार्य असल्याचे ठाऊक असल्याने जॉर्जियाने अप्रतिम सांघिक खेळ केला. तारांकित आक्रमकपटू क्वारात्सखेलियाने सामना सुरू होऊन अवघे ९३ सेकंद झाले असतानाच गोल करत जॉर्जियाला अनपेक्षित आघाडी मिळवून दिली.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी मेडिकलसाठी ४ ते ५ वर्षे अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे. ९४२११६३१२४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**‘सुवर्ण’ कन्येकडून पदकाची आशा**

# ऑलंम्पिकमध्ये अनुभवता येणार ज्योतीचा वेग

**। विशाखापट्टणम । वृत्तसंस्था ।**

**भारताची युवा धावपटू ज्योती याराजी हिनं मागील वर्षी बँकॉकमध्ये झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. तिनं १३.०९ सेकंदात हे अंतर पार करून सर्वांनाच आश्चर्यचकीत केलं होतं. आता ती पंचकुलामध्ये सुरू असलेल्या आंतरराज्यीय स्पर्धेत सहभागी झाली असून २६ जुलै २०२४पासून पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिंम्पिकसाठी तिची तयारी सुरू आहे.**



जर सुदैवानं त्यांच्या पाठीशी ठाम पणे उभं राहून त्यांना प्रगती करण्यासाठी प्रोत्साहन देणारे देवदूत मिळाले, तर मग त्यांचं नशीब उजळलंच म्हणून समजायचं. रिलायन्स फाउंडेशनच्या संस्थापिका आणि अध्यक्षा नीता मुकेश अंबानी यांनी अशाप्रकारे अनेक हिऱ्यांना चकाकण्यास मदत केली आहे. संपूर्ण देशाची मान अभिमानानं उंचवणारी ज्योती याराजीसुद्धा त्यापैकीच एक.

बाळाचे पाय पाळण्यात दिसतात हेच खरं. ज्योतीला लहानपणापासूनच खेळांची प्रचंड आवड. सगळीच लहान मुलं धावतात पण ज्योतीचं धावणं हे सर्वसामान्य नव्हतं. ती अगदी वाऱ्याच्या वेगानं झपाट्यानं धावायची. हेच तिचं गुणवैशिष्ट्य तिच्या शाळेतील शिक्षकांनी हेरलं. शिक्षक आणि मुख्यध्यापकांनी तिला क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केलं.

ज्योतीची आई सांगते, आमच्याकडे दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत होती, पण ज्योतीचा खेळ थांबवू नका, तिच्या करियरची जबाबदारी माझी, या मुख्यध्यापकांच्या एका शब्दावर आम्हीही ज्योतीला प्रोत्साहन दिलं.

दहावी उत्तीर्ण होण्याआधीच तिनं विविध क्रीडा स्पर्धांमध्ये अनेक पदकं पटकावली होती. त्यानंतर ज्योतीनं खेळांवरच लक्ष केंद्रित केलं.

अनेक दानशूर व्यक्तींच्या म दतीनं ती हैदराबादला गेली आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळायला सुरुवात केली. प्रशिक्षकसुद्धा तिचं टॅलेंट पाहून चक्रावले. त्यांनी तिला स्पेशल ट्रेनिंग द्यायचं ठरवलं. ज्योती विविध जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन जिंकू लागली.

हैदराबादहून ओडिशाला गेल्यानंतर ज्योती स्पोर्ट्स हॉस्टेलमध्ये राहिली. तिथं तिनं धावण्याचा सराव आणखी वेगानं सुरू केला. सध्या ती रिलायन्स फाऊंडेशनच्या मदतीनं प्रगती करतेय. नीता मुकेश अंबानी यांनी तिला उत्तम पाठिंबा दिला आहे. या पाठिंब्यामुळेच ती इथपर्यंत पोहोचू शकली, अशा भावना तिच्या आईनं व्यक्त केल्या. त्या आपल्या मुलीच्या प्रगतीबाबत प्रचंड आनंदात आहेत.

www.krushival.in | कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# बालांगण



## बदल गुगल क्रोममधील

टेक फन

गुगल क्रोमला आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात महत्त्वाचं स्थान आहे. इंटरनेटचा वापर करणाऱ्यांचं पान क्रोम ब्राउजरशिवाय हलणार नाही. क्रोमच्या आधी लोक इंटरनेट एक्सप्लोरर आणि मोझिला फायरफॉक्सचा वापर करत असत. पण आता डेस्कटॉपच नाही तर मोबाईल फोनवरही क्रोमचाच वापर होतो. गेल्या काही वर्षांमध्ये गुगल क्रोममध्ये कसे बदल झाले त्याचा आढावा घेऊ या.

✼ कोणत्याही ब्राउजरचा इंटरफेस महत्त्वाचा असतो. क्रोमचा इंटरफेस स्पष्ट आणि सर्वोत्तम आहे. क्रोम वापरताना युजर्सना फारशा अडचणी येत नाहीत.

✼ क्रोमच्या ब्राउजिंगचा वेग उत्तम आहे. सुरूवातीपासूनच क्रोमचा वेग चांगला होता. वेगवान ब्राउजिंगमुळे लोकांना गुगल क्रोम खूप आवडतं.

✼ क्रोममध्ये गरजेनुररूप नवे फीचर्स जोडण्यात आले आहेत. त्यामुळे यात अनेक ऑप्शन्स मिळतात. 'इन कॉग्निटो' हा मोड गुगल क्रोमने सर्वात आधी जोडला. याचा 'अॅड ब्लॉक' फीचरही खूप लोकप्रिय आहे.

✼ जगभरातल्या ६० टक्क्यांपेक्षा जास्त कॉम्प्युटर्समध्ये गुगल क्रोमचा वापर होतो. गुगल क्रोम इंस्टॉल केल्यानंतर गुगलच्या प्रत्येक सेवेचा लाभ तुम्हाला मिळतो.



✼ गुगलने गेल्या काही काळात क्रोममध्ये फार मोठे बदल केलेले नाहीत त्यामुळे गुगल क्रोम युजर्सना आश्चर्याचा धक्का देऊ शकतं.

## इक्वेट्रिअन आणि कुरश

फन टाईम

छोट्यांनो, बॅडमिंटन, कुस्ती, हॉकी, नेमबाजी असे खेळ आपल्याला माहीत आहेत. पण आपण नावही न ऐकलेल्या खेळांमध्येही आपल्या देशातल्या खेळाडूंनी पदकं मिळवली. इक्वेस्ट्रिअन आणि कुरश हे असेच दोन क्रीडाप्रकार. हे क्रीडाप्रकार नेमके काय आहेत? पाहू या...



घोडेस्वारी आपल्याला माहीत आहे. इक्वेट्रिअन म्हणजे घोडेस्वारचीचाच एक प्रकार. घोडा आणि मनुष्य हे समीकरण फार पूर्वीपासून चालत आलेले आहे. या खेळात घोडेस्वाराला बरीच मेहनत घ्यावी लागते. घोड्याला विशिष्ट पद्धतीने उडी मारायला लावणं, घोड्यासोबत अडथळे पार करणं असं बरंच काही करावं लागतं. हा खेळ खेळण्यासाठी कौशल्याची गरज असते.


आधुनिक काळातही घोड्यांवर बसून पोलो, हॉर्स हॉकी इ. खेळ खेळले जातात.

कुरश म्हणजे कुस्तीसारखाच क्रीडाप्रकार. तुर्कीमध्ये कुस्तीला कुरश असं म्हटलं जातं. मध्य आशिया खंडातल्या देशांमध्ये कुरश खूप लोकप्रिय आहे. या क्रीडाप्रकारात भारताला रौप्य आणि कांस्यपदक मिळालं. या खेळात प्रतिस्पर्धी खेळाडूला टॉवेलने पकडून जोरात खाली पाडावं लागतं. यासाठी ताकद आणि कौशल्य दोन्हींची गरज असते. यात हलाल, यंबोश आणि चला अशा तीन पद्धतींनी गुण मिळतात. या खेळातही पेनल्टी असते. पहिल्या पेनल्टीला तंबिक, दुसरीला डक्कीअसं म्हटलं जातं. तिसरी पेनल्टी म्हणजे गिरोम. यानंतर खेळाडूला स्पर्धेच्या बाहेर केलं जातं.

## बर्फाच्छादित आईसलँड

सफर देशांची

आईसलँड हा युरोप खंडातला अगदी छोटा देश आहे. हा देश युरोपचं पश्चिमेचं टोक आहे. आईसलँड हे एक बेट आहे. रेकजाविक ही आईसलँडची राजधानी. हा देश पाण्याने वेढला आहे. आईसलँडच्या ११ टक्के भागात हिमनग आहेत. हा देश ज्वालामुखीवर वसला आहे. त्यामुळे इथे ज्वालामुखीशी संबंधित घडामोडी घडत असतात. 'ऐयाफ्यथ्लायोकुथ्ल' नावाचा ज्वालामुखी येथे आहे. आइसलंडमध्ये अनेक सुप्त आणि जागृत ज्वालामुखी आहेत. २०१० मध्ये इथे एका ज्वालामुखीचा उद्रेक होताच संपूर्ण युरोपमधल्या हवाई वाहतुकीवर परिणाम झाला होता. ग्रीनलँड समुद्र आणि उत्तर अटलांटिक महासागर यांच्या मध्ये आईसलँड आहे. या देशात अनेक डोंगर आहेत. भरपूर बर्फ आहे. सुरूवातीच्या काळात आईसलँडमध्ये फक्त कोल्हे होते. बाहेरून इथे आलेल्या लोकांनी पाळीव प्राणी आणि रेनडिअर आणले. इथली जंगलं संरक्षित आहेत तसंच प्राण्यांचंही रक्षण केलं जातं. आईसलँडमध्ये चार राष्ट्रीय उद्यानं आहेत तर ८० पेक्षा जास्त निसर्ग उद्यानं आहेत. आईसलँडमध्ये जवळपास २०० ज्वालामुखी आहेत. आईसलँडमध्ये पाहण्यासारखं बरंच काही आहे. इथे गरम पाण्याचे नैसर्गिक झरे आहेत. हिमनगांमुळे तयार झालेले गार पाण्याचे धबधबे आहेत. इथल्या समुद्रात व्हेल मासे पाहता येतात. या देशातल्या मुलांना मोफत शिक्षण दिलं जातं. डॅनिश आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषा इथे शिकवल्या जातात. इथली मुलं हँडबॉल आणि फुटबॉल खेळतात. हा देश एके काळी नॉर्वेचा भाग होता. त्यानंतर जवळपास ५०० वर्ष इथे डेन्मार्कचं राज्य होतं. १९४४ मध्ये आईसलँड स्वतंत्र झाला.



## लवकर उठून अभ्यास!

स्टडी टिप्स


दोस्तांनो, शाळा आणि ट्युशन झाल्यानंतरचा बराचसा वेळ तुम्ही अभ्यासासाठी देता. आई-बाबा अभ्यास नीट व्हावा, त्यात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी सतत आग्रही असतात. विशेषत: परीक्षेच्या काळामध्ये अनेकवेळा सकाळी लवकर उठून अभ्यासाचा सल्ला देतात. काही विद्यार्थी रात्री उशीरापर्यंत जागून अभ्यास करतात, तर काही विद्यार्थी जसा वेळ मिळेल तसं आपल्या अभ्यासाचं वेळापत्रक तयार करतात. पण सकाळी लवकर उठून केलेल्या अभ्यासामुळे नेमका काय फायदा होतो, जाणून घेऊ या.

सकाळच्या वातावरणात एकाग्रतेने अभ्यास करता येतो. पहाटेच्या वेळेत आपण जो अभ्यास करतो त्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रीत करता येतं. त्यामुळे आकलन क्षमता वाढते आणि अभ्यास लक्षात राहतो. सकाळी उठून अभ्यास करण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे सकाळचं वातावरण शांत असतं. यावेळेत कोणत्याही प्रकारचा गोंगाट नसतो. त्यामुळे अभ्यासामध्ये कोणतीही बाधा येत नाही. याऊलट दिवसभरात कोणत्याही वेळेत अभ्यास करताना घरात किंवा इतर कोणत्या ठिकाणी तुम्हाला आजूबाजूच्या आवाजाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे पहाटे केलेला अभ्यास विद्यार्थ्यांना जास्त लक्षात राहतो. पहाटे लवकर उठून अभ्यास केल्याने तुमच्याकडे भरपूर वेळ शिल्लक रहातो. त्यामुळे तुम्ही इतर कामांचंही नियोजन करु शकता. सकाळी लवकर उठून अभ्यास करणं चांगलं तर आहेत, शिवाय आरोग्याच्यादृष्टीनेही लाभदायक आहे. त्यामुळे दिवसभराचा आळस निघून जातो. अभ्यासाबरोबरच तुम्ही थोडा वेळ व्यायामही करु शकता. ज्यामुळे शरीरही निरोगी राहते.



## उठाबशा काढणे शिक्षा नव्हे?

हेल्थ वेल्थ



बालमित्रांनो, कधीकधी आपण शाळेमध्ये मस्ती केली तर शिक्षक शिक्षा म्हणून उठाबशा काढायला लावतात. पण तुम्हाला माहिती आहे का? की उठाबशा काढणे ही शिक्षा नसून एक प्रकारचा व्यायाम आहे. हा व्यायाम आपल्या आरोग्यासाठी खूप लाभदायक आहे. नियमित उठाबशा काढल्याने मांड्या आणि पोटऱ्यांचे स्नायू बळकट होतात. उठाबशांमुळे फक्त कमरेखालचा भागच नव्हे तर पोट, पाठ अशा अवयवांचाही व्यायाम होतो. यामुळे आपली शरीरयष्टी सुधारण्यास मदत होते. उठाबशांमुळे आपली ताकद वाढते. परिणामी आपण दिवसभर फ्रेश राहू शकतो. पायातली ताकद वाढल्याने लवकर थकवा येत नाही. कान पकडून उठाबशा काढण्यामुळे लक्ष केंद्रित होते आणि स्मरण वाढते. या प्रकारामुळे आपल्या मेंदूचे अनेक भाग अॅक्टीव्हेट होतात. तसेच कान पकडून उठाबशा काढल्या तर पोटाची चरबी कमी होते. कानाच्या पाळ्या दाबल्या गेल्याने तेथील अॅक्यूप्रेशर पॉइंटस उत्तेजित होतात आणि मेंदूचा डावा आणि उजवा भाग कार्यरत होतो. शरीराच्या अनेक हालचाली, बोलणे, स्मरण मेंदूच्या आदेशावर होत असतात. त्यामुळे मेंदूला चालना मिळते. व्यायामाला वेळ मिळत नसेल तर न विसरता रोज ५०-१०० उठाबशा तुम्ही नक्कीच काढू शकता.

ठिपके जुळवा



## सी.ए. करायचं आहे?


कोण होणार?

कॉमर्स म्हणजेच वाणिज्य शाखेतल्या बऱ्याच विद्यार्थ्यांचा कल सीए होण्याकडे असतो. सीए म्हणजे चार्टर्ड अकाउंटंट. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियातर्फे हा अभ्यासक्रम ठरवला जातो आणि परीक्षा आयोजित केल्या जातात. या अभ्यासक्रमाचे चार टप्पे असतात. सीए फाउंडेशन, सीए इंटरमिडिएट, प्रॅक्टिकल ट्रेनिंग आणि सीए फायनल. बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी सीए फाउंडेशनसाठी अर्ज करू शकतात. यात प्रिन्सिपल अँड प्रॅक्टिस ऑफ अकाउंटिंग, मर्कंटाइल लॉ, जनरल इंग्लिश, बिजनेस मॅथमॅटिक्स, लॉजिकल रिजनिंग, स्टॅटिटिक्स, बिझनेस इकॉनॉमिक्स अशा विषयांशी संबंधित प्रश्न विचारले जातात. नऊमहिन्यांच्या प्रशिक्षणानंतर विद्यार्थी इंटरमिजिएट परिक्षेसाठी अर्ज करू शकतात. सीए इंटरमिजिएटमध्ये आठ पेपर असतात. याची विभागणी दोन गटांमध्ये केलेली असते.



प्रॅक्टिकल ट्रेनिंगआधी विद्यार्थ्यांना पहिल्या गटात आणि हे ट्रेनिंग पूर्ण होण्याआधी दुसऱ्या गटात उत्तीर्ण व्हावं लागतं. प्रॅक्टिकल ट्रेनिंगच्या काळात विद्यार्थ्यांना सीएसोबत काम शिकून घ्यावं लागतं. तीन वर्षांचा प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर विद्यार्थी सीएच्या शेवटच्या म्हणजे सीए फायनलसाठी पात्र ठरतात. सीए फायनलआधी विद्यार्थ्यांना इंटिग्रेटेड कोर्स ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अँड सॉफ्ट स्किल हा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. सीए फायनलमध्ये दोन गटांमध्ये आठ पेपर असतात.

रंगवा हे चित्र



## आर यु ह्युमन?

टेक्नो टॉक

छोट्या मित्रमैत्रिणींनो, तुम्हाला अभ्यासासाठी पूरक ठरणारे वेगवेगळे प्रोजेक्ट्स, शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी इंटरनेटवरील विविध संकेतस्थळांना भेटी द्याव्या लागत असतील. त्यापैकी काही संकेतस्थळांची होम पेजेस लगेच उघडतात तर काही आर यु ह्युमन? असं विचारतात. पण हा प्रश्न का विचारला जातो. याचा तुम्ही कधी विचार केलाय? काही संकेतस्थळांवर तुम्हाला कॅप्चा (Captcha) येत असेल आणि सोबतच तुम्ही माणूस आहात का? असा प्रश्नही विचारला जात असेल. मात्र हा प्रश्न विचारण्यामागे काय कारण असतं? हा प्रश्न का विचारला जातो? याविषयी जाणून घेऊया. खरं तर कॅप्चा माणूस आणि कम्प्युटरला विभागतो. त्यामुळे लॉगीन करत असलेला किंवा संकेतस्थळाला भेट देणारा व्यक्ती माणूसच आहे का? हे तपासण्यासाठी त्याला डिझाइन केले आहे. संकेतस्थळावर आलेला माणूस आहे की -एआय हे जाणून घेण्यासाठी तो प्रश्न विचारला जातो. संगणकापेक्षा माणसासाठी कॅप्चा सोडवणं सोपं असतं. त्यामुळे आर यु ह्युमन, असा प्रश्न विचारला जातो.




## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) ईडन गार्डन्स क्रिकेट मैदान कोणत्या शहरात आहे?
२) होपमॅन कप कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
३) कपिल देव यांनी कसोटी क्रिकेटमध्ये किती बळी घेतले?
४) मिशा ग्रेवाल ही खेळाडू कोणता खेळ खेळते?
५) ओळीने तीन विंम्बल्डन किताब जिंकणारी एकमेव महिला टेनिसपटू कोण?
६) जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेत पी.व्ही. सिंधूला कोणतं पदक मिळालं?
७) सूर्यमालेचा शोध कोणी लावला?
८) कांदा खाण्याचा महोत्सव कोणत्या देशात पार पडतो?
९) ख्रिसमस बेट कोणत्या महासागरात आहे?
१०) तुर्कमेनिस्तान या देशाची राजधानी कोणती?

उत्तर : १) कोलकाता २) लॉन टेनिस ३) ४३४ ४) स्क्वॅश ५) स्टेफी ग्राफ ६) रौप्य ७) कोपर्निकस ८) स्पेन ९) हिंदी १०) अश्गाबात

## हटके गेम्स

स्मार्ट अॅप्स




गुगल प्ले स्टोअरवर बरेच गेमिंग अॅप्स आहेत. त्यापैकी काही अॅप्स खूपच लोकप्रिय आहेत. कोट्यवधी लोकांनी अशी अॅप्स डाउनलोड केली आहेत. विशेष म्हणजे ही अॅप्स तुमच्या मोबाईलमधली फार जागा व्यापत नाहीत. अशाच काही गेमिंग अॅप्सबाबत जाणून घेऊ या.

✼ डॉ. ड्रायव्हिंग हा रेसिंग गेम आहे. हा गेम स्मार्टफोनवर अगदी सहज खेळता येईल. रेसिंग गेमच्या चाहत्यांसाठी हा गेम म्हणजे एक पर्वणीच आहे.

✼ बास्केटबॉल शूट अॅप एक कोटी लोकांनी डाउनलोड केलं आहे. यात बॉल बास्केटमध्ये गेल्यावर पॉईंट्स मिळतात. प्रत्येक सेटमध्ये ठराविक बॉल दिले जातात.

✼ आर्चरी हा गेम पाच कोटी लोकांनी डाउनलोड केला आहे. या अॅपचा आकार २० एमबी आहे. इथे तुम्हाला नेम धरायचा आहे. योग्य ठिकाणी निशाणा लागला तर गुण मिळतात.

✼ प्ले टेनिस हा गेम अनेकांना आवडतो. नावावरूनच हा टेनिस गेम आहे हे कळतं. यात तुम्हाला टेनिस खेळायचं आहे. नियमानुसार गुण दिले जातात. प्रतिस्पर्धी खेळाडूला हरवणं हे तुमचं उद्दिष्ट असतं.

दोस्त हे मस्त


### हॅगफिश

हॅगफिश नावाचा एक जलचर आहे. हा प्राणी खोल समुद्रात राहतो. हा किळसवाणा प्राणी आहे. भूक लागल्यानंतर हॅगफिश जवळून जाणाऱ्या माशाच्या शरीराला चिकटतो. माश्याच्या शरीराच्या आरपार जाऊन तो त्या माशाला खाऊन टाकतो.



खादाडी

### चॉकलेट मफिन्स



चॉकलेट केक, चॉकलेट मफिन्स तुम्हाला आवडत असतील. आपण चॉकलेट मफिन्सची रेसिपी पाहू या. यासाठी पाऊण कप मैदा, दोन चमचे बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, तीन चमचे कोका पावडर, पाऊण कप पिठी साखर, दीड कप चॉकलेट चिप, एक कप दूध, एक तृतीयांश कप तेल, एक अंडं आणि एक चमचा व्हॅनिला इसेन्स हे पदार्थ घ्या. ओव्हन १८० अंश सेल्सियस तापमानात प्रीहिट करून घ्या. त्यात मफिन्सचा ट्रे ठेवा. आता एका मोठ्या भांड्यात मैदा, बेंकिंग पावडर, बेकिंग सोडा, कोका आणि पीठी साखर घाला. यात एक कप चोको चिप घाला. एका जगमध्ये अंडं, दूध, व्हॅनिला इसेन्स आणि तेल घालून घुसळून घ्या. आता ओलं मिश्रण कोरड्या मिश्रणात घाला. नीट मिसळून घ्या. आता हे मिश्रण मफिन ट्रेमध्ये भरा. अर्धा कप चोको चिप त्यावर भुरभुरा. २० ते २२ मिनिटं बेक करा. झाले मफिन्स तयार!

लाईफस्टाईल

### सेल्फी काढताय?



सतत सेल्फी घेत राहणं आणि आपला फोटो चांगला यावा यासाठी फिल्टर्सचा वापर करणं हा खरं तर एक विकार आहे. एका संशोधनातून हे समोर आलं आहे. आपला फोटो चांगला यावा असं प्रत्येकालाच वाटत असतं. यासाठी मग स्मार्टफोनमधल्या फिल्टर्सचा वापर केला जातो. याचा वापर थोड्याफार प्रमाणात केला तर ठीक पण त्याची सवय घातक ठरू शकते.

योगा टाईम

### ऐका योग संगीत



झोपायच्या आधी गाणी ऐकण्याचे खूप फायदे असतात. पण यावेळी कोणतंही गाणं ऐकून चालत नाही. यावेळी शांत असं योग संगीत ऐकायला हवं. संगीत ऐकल्यामुळे हृदयावर चांगला परिणाम होतो. योग संगीत ऐकल्याने ताण कमी होतो आणि शांत झोप लागते.




**२५ जूनपासून संगीतकार मदनमोहन यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. हिंदी चित्रपटसृष्टीवर आपल्या संगीतरचनांमुळे प्रभाव पाडणारा व अनेक सुरेल रचना संगीतप्रेमींना बहाल करणारा, १९५० ते १९७५ या पंचवीस वर्षातला लोकप्रिय संगीतकार म्हणून नावलौकिक मिळविलेल्या मदन मोहनने आपल्या सिनेकारकिर्दीत सुमारे ९५ चित्रपटांना संगीत दिले. सुमारे ७०० गाणी त्याने संगीतबद्ध केली. अशा या थोर संगीतकाराच्या कारकिर्दीचा धावता आढावा त्याच्या जन्मशताब्दीनिमित्त घेण्याचा प्रयत्न करीत आहे.**



# संगीतकार मदनमोहन ! मधुर मेलडीचा जादुगार



शरद कोरडे

मदनमोहनचा जन्म २५ जून १९२४ मध्ये इराकमधील कदरिस्तान येथे झाला. त्याचे वडील रावबहाद्दूर चुनीलाल कोहली हे इराकी कदरीस्तान येथे अकाऊंट जनरल म्हणून पोलीस खात्यात कामाला होते. मदनमोहनच्या वयाची पाच वर्षे इराकमध्ये गेली. इराक ब्रिटनपासून स्वतंत्र झाल्यावर ते हिंदुस्तानात झेलम जिल्ह्यातील चकवाल या आपल्या मूळ गावी परत आले. भारत-पाक फाळणी झाल्यावर पंजाबांतील हा भाग पाकिस्तानात गेला. मदन मोहनसह कुटूंबाला आजोबांकडे देऊन रायबहाद्दूर चुनीलाल व्यवसाय शोधण्यासाठी मुंबईला आले. मदनमोहनचे आजोबा योगराज हे प्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांच्याकडे ते आईसह सहा वर्षे राहिले. आई भगवतीदेवी कवियित्री होती. तिला संगीताची खूप आवड होती. आजोबाही संगीताचे जाणकार होते. येथेच मदनमोहनला संगीताचे आकर्षण निर्माण झाले. मुंबईला व्यवसायासाठी गेलेल्या रायबहाद्दूर यांना मुंबईत हिमांशुरॉय व देविकाराणी यांच्या बॉम्बे टॉकीजमध्ये पार्टनरशिप मिळाली. त्यांचे सर्व कुटूंब मग मुंबईत आले.

मुंबईत शिक्षण घेत असताना मदनमोहन यांना हिंदी चित्रपटांशी संबंधित असलेल्या कुटूंबांपैकी राजकपूर, नर्गिस व सुरैय्या हे बालमित्र मिळाले. आपण आपल्या वडीलांसारखे कर्तृत्ववान व्हायचे या महत्वाकांक्षेमुळे शिक्षण संपताच मदनमोहनने आर्मीमध्ये प्रवेश घेण्यासाठी डेहराडून इथल्या कोलोनेड ब्राऊन मिलिटरी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळविला. त्यावेळी त्यांचे वय सतरा वर्षांचे होते. १९४३ मध्ये ते सेकंड लेफ्टनंट म्हणून सैन्यात दाखल झाले. दोन वर्षे सैन्यात राहिल्यावर त्यांना संगीताची आवड स्वस्थ बसू देईना. दुसरे महायुद्ध सुरु झाल्यावर ते मिलिटरी सोडून मुंबईला आले. त्यानंतर ऑल इंडिया रेडिओच्या लखनौ केंद्रात त्यांनी नोकरी पत्करली. गझल व शास्त्रीय संगीत जाणण्याची संधी त्यांना या काळात मिळाली. त्यावेळी लखनौ केंद्रांत उस्ताद फैय्याजखान, उस्तारद अकबरखान, बेगम अख्तर, ललत महमुद या महान गायकांशी त्यांचा संबंध आला. त्यानंतर मदनमोहन परत मुंबईला आले. हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेता होण्याची स्वप्ने त्यांनी पाहिली. प्रथम 'पदी' नावाच्या चित्रपटात त्यांना नायकाचे काम मिळाले. पुढे शहीद-१९४८, 'आसूं' १९५३, 'मुनीमजी' १९५४ अशा सुमारे आठ-नऊ चित्रपटात त्यांनी लहान मोठ्या भूमिका केल्या. पुढे त्यांनी नायक होण्याचा विचार सोडून संगीतकार म्हणून चित्रपटसृष्टीत करियर करण्याचा विचार केला. सुरूवीताली संगीतकार श्यामसुंदर यांच्यासोबत सहाय्यक म्हणून त्यांनी 'अॅक्ट्रेस' व 'निर्दोष' या चित्रपटांसाठी काम केले. नंतर सचिन देव बर्मन यांच्यासोबत 'दो भाई' व सी. रामचंद्र यांच्यासोबतही सहाय्यक म्हणून काम केले.

१९५० साली मदनमोहन यांना 'आँखे' हा चित्रपट स्वतंत्रपणे संगीतकार म्हणून मिळाला. या चित्रपटासाठी त्यांनी मुकेशच्या आवाजात पहिले गाणे रेकॉर्ड केले. ते 'प्रीत लगाके मैने ये फल पाया' या चित्रपटात भारतभूषण व नलिनी जयवंत ही जोडी होती. १९५१ साली मदनमोहन यांना 'मदहोश' हा चित्रपट मिळाला. त्यात मनहर देसाई व मीनाकुमारी यांनी कामे केली होती. या चित्रपटापासून लता मंगेशकर मदनमोहन यांचा स्वतःचा कोणताच ग्रुप नसल्याने ते वेगवेगळ्या निर्मात्यांकडे काम करीत असत.

चेतन आनंद यांनी मात्र मदनमोहन यांना आपले 'हकिकत', 'हंसते जख्म', 'हिर रांझा', 'हिंदुस्थानकी कसम' असे चार चित्रपट दिले. 'आखरी खत' मात्र खय्याम यांना दिला. चेतन आनंद यांच्यावरील चारही चित्रपटांची गाणी प्रचंड गाजली. या चारही चित्रपटांची गीते कैफी आझमी यांनी लिहिली होती.

१९६० ते १९७० च्या दशकात मदनमोहन व लता मंगेशकर या जोडीने उत्तमोत्तम गीते रसिकांना बहाल केली. लता मंगेशकर यांचा स्वर, सूर व स्वभाव यांची मोहिनी मदनमोहनवर पडली. परस्परातील सहृदयतेने त्यांच्यात भावा-बहिणीचे नाते दृढ झाले. लतादिदी त्यांना मदनभैय्या म्हणून संबोधू लागला. लतादिदींबाबत मदनमोहन म्हणतात, 'दीदींमधील सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांच्या मनाचा निर्मळपणा त्यांच्या या गुणाला तोड नाही. त्या खूप भावनाप्रधान आहेत. त्यामुळे त्यांची सुखदुःखे उत्कट असतात. तशा त्या खोल व अंतर्मुखही आहेत. त्यामुळे त्यांच्या केवळ ओळखींच्या व्यक्तींना त्यांच्या मनातील आंदोलने फारशी करणार नाहीत. गाणे हा त्यांच्या जीवनविषयक अनुभवांचा अविष्कार आहे. लतादिदींच्या या प्रतिभेचा मदनमोहन यांनी आपल्या संगीतात उपयोग करून घेतला. त्यांच्या गायन वैशिष्ट्यांनी नटलेली अनेक गीते त्यांनी रसिकांपुढे अलिबाबाची गुहा उघडावी व रत्ने माणकांच्या तेजाने श्रोत्यांनी न्हाऊन निघावे अशी किमया मदनमोहन यांनी केली. 'अनपढ' मधील 'आपके नजरोंने समझा प्यारके काबिल मुझे', 'वह कौन थी?' मधील 'लग जा गले के फिर ये हंसी रात हो न हो', 'जो हमने दास्तां अपनी सुनाई आप क्यू रोये', 'नैना बरसे रिमझिम रिमझिम', 'जहाँआरा' मधील 'ओ चूप रहे तो मेरे दिलके दाग', 'हंसते जख्म' मधील 'आज सोचा तो आँखे भर आयी', 'मेरा साया' मधील 'तू जहाँ जहाँ चलेगा मेरा साथ साथ होगा', 'दिल की राहे' मधील 'रहमे उलफत के निभाये कैसे', 'दुल्हन एक रातकी' मधील 'मैने रंगली आज चुनरियाँ' अशी गाणी तुफान गाजली. लता मंगेशकर मदनमोहन यांना 'गझलोंका सम्राट' म्हणत असे. त्यांनी अनेक चित्रपटांत उत्तमोत्तम गझलांना संगीतसाज देऊन अजरामर केल्या आहेत. लता मंगेशकर व महंमद रफी यांच्याकडून या अमर गझला प्रयत्नपूर्वक गाऊन घेतल्या आहेत. 'अदालत' मधील 'जाना था हमसे दूर बहाने बना लिये', 'उनको ये शिकायत है के हम कुछ नही कहते', 'वह कौन थी?' मधील 'जो हमने दास्तां अपनी सुनायी आप क्यू रोये' 'गझल' मधील 'नगमा ओ शेरकी सौगात किये पेश करू', 'जहाँआरा' मधील 'वो चूप रहे तो मेरे दिलगे दाग जलते है', 'दस्तक' मधील 'हम है मता-ए-कूचा-ओ-बाजार की तरह' हिंदुस्थानकी कसम मधील 'है तेरे साथ मेरी वफा मै नही तो क्या' अशा अनेक गझला त्यांनी लता दिदीकडून गाऊन घेतल्या. महंमद रफी यांनी गाईलेली 'रंग और नूरकी हंसी रात किसे पेश करू' ही 'गझल' मधील गझल तर अजरामर झाली आहे. मदनमोहन यांनी गझलचे पावित्र्य जपून तिला एक अनोखा आयाम दिला. आपल्या सांगितिक प्रतिभेतून व सर्जनतेतून त्यांनी गझलचे सूर रसिकांच्या काळजापर्यंत पोहोचविले.

मदनमोहन यांना फिल्मफेअरचा कोणताही पुरस्कार त्यांच्या कारकिर्दीत मिळाला नाही. राजेंद्रसिंग बेदी यांच्या 'दस्तक' या चित्रपटासाठी १९७० साली त्यांना संगीताचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. मात्र इतर पुरस्कारांनी कायम त्यांच्याकडे पाठ फिरवली. हिंदी चित्रपटसृष्टींनी उपहास व उपेक्षेने ते खचून गेले. सतत येणाऱ्या अपयशानेही त्यांच्या जीवनावरील विश्वास उडाला. त्यांचे दारुचे व्यसन वाढत गेले. अखेर लिव्हर सोयरासीस या आजाराने १४ जुलै १९७५ मध्ये वयाच्या ५१ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. २००४ मध्ये त्यांनी जपून ठेवलेल्या कंपोझिशन त्यांचा मुलगा संजीव कोहली यांनी निर्माते यश चोप्रा यांना दाखविला. त्यांना त्या धून आवडल्या. त्यांच्या 'वीर झारा' या चित्रपटासाठी त्या धूनवर जावेद अख्तर यांच्याकडून गीते लिहून घेण्यात आली. लता मंगेशकर यांच्या आवाजात ती गाणी रेकॉर्ड करून घेण्यात आली. गाणी गाताना लता दिदींच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहत होत्या. आपल्या भावाच्या आठवणींनी त्यांना गहिवरून आले. संपूर्ण स्टुडिओ स्तब्ध झाला होता. २००५ सालच्या 'आयफा फिल्म' महोत्सवात या चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाला पुरस्कार मिळाला. मदनमोहन यांच्या मृत्यूनंतर तब्बल २७ वर्षांनी त्यांच्या संगीताला पुरस्कार मिळाला होता. अशा या संवेदनशील प्रतिभावंत संगीतकाराला चित्रपटरसिक म्हणून आमचा मानाचा मुजरा. **

## कलाविश्वाचे महान प्रणेते
# प्रबोधनकार ठाकरे ते बाळासाहेब ठाकरे

श्रीराम शेटये

> **प्रबोधनकार ठाकरे तथा केशव सिताराम ठाकरे हे थोर व्यक्तिमत्व होते. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार पुढे नेणारे थोर विचारवंत इतिहासकार. भिक्षुकांचाही कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक. अशी अनेक वलये प्रबोधनकार ठाकरे यांच्या भोवती होती.**

चित्रपटात आपण एखादा हिरो बघतो जो गुंड प्रवृत्तीच्या लोंकाना अद्दल घडवून गरीबांना न्याय मिळवून देतो. एकाच वेळी अनेक दुष्ट लोकांना झोडपून काढतो. गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देतो. अगदि भ्रष्ट पोलीस, भ्रष्ट राजकारणी यांना फोडून काढतो.

प्रत्यक्ष जीवनात हे शक्य नाही. परंतू एका माणसाने मात्र हे शक्य करून दाखविले. गरीब शेतकरी, कामगार मजूर, दिनदलीत यांना न्याय मिळवून दीला. ते म्हणजे बाळासाहेब ठाकरे. ही क्रांतीची ज्वोत बाळासाहेंबाच्या हृदयात प्रबोधनकारांनी निर्माण केली.

प्रबोधनकार ठाकरे तथा केशव सिताराम ठाकरे हे थोर व्यक्तिमत्व होते. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार पुढे नेणारे थोर विचारवंत इतिहासकार. भिक्षुकांचाही कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक. अशी अनेक वलये प्रबोधनकार ठाकरे यांच्या भोवती होती. समाजसुधारणांना जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सर्वस्व पणाला लावणारे नाटककार आणि निर्माते दिग्दर्शक देखिल होते. मोजक्याच पण ठसकेदार भुमिका करणारे अभिनेते देखिल होते. आचार्य अत्रे आणि प्रबोधनकार यांची दोस्ती तर जगजाहिर होती.



शाम ची आई चित्रपटात त्यांनी भुमिका केली होती. जातनिष्ठ इतिहास लेखनाचा फोलपणा दाखवून इतिहासाची नवी मांडणी करणारे इतिहासकार. महाराष्ट्रभर सातत्याने फिरून विद्रोहाची पेरणी करणारे ज्वलंत वक्ते. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मविर भाऊराव पाटील यांचे गुरूतुल्य मार्गदर्शक. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे वयाच्या सत्तराव्या वर्षी तुरूंगात जाणारे नेते.

याशिवाय लेखक, कवी, संगीतकार, सतारवादक, चित्रकार, फोटोग्राफर, शिक्षक, उद्योजक, अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाचे कतृत्व शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य.

वडीलांची नोकरी सुटल्यामुळे पनवेल मध्ये पुढच शिक्षण नसल्याने शिक्षण थांबले. फी साठी दीड रुपया कमी पडला म्हणून मॅट्रिकची परीक्षा देता आली नाही. वकील बनण्याचे स्वप अपुरे राहिले. तेव्हांपासुन साईनबोर्ड रंगवीणे, रबरी स्टॅम्प बनविणे, बुक बायडींग, भिंती रंगविणे, फोटोग्राफी, मशीन मेकॅनिक, असे उद्योग प्रबोधनकारांनी सुरु केले. कधी नाटक कंपनीत तर कधी सिनेमा कंपनीत काम केले. नाटक कंपनीत काम करीत असतानाच मंजुळा गुप्ते या युवतीशी त्यांचा १९१० साली अलिबाग जवळील वरसोली या गावी विवाह झाला. नंतर मुंबईत दादरला, बिऱ्हाड टाकल ते अगदि वांद्र्याला मातोश्री बंगल्यावर जाईपर्यंत. प्रबोधन सुरू असतानाच दादरला खांडके बिल्डिंगमध्ये स्वाध्यायमाला सुरू झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर शिवसेनेची स्थापना झाली ही सगळ प्रबोधनकारांचीच संकल्पना होती. प्रबोधनकारांनी काढलेल्या वाघाच्या चित्राचा शिवसेनेच्या बोधचिन्हात समावेश झाला.

महाराष्ट्रातील रंजलेल्या गांजलेल्या पिडीत लोकांना हक्क मिळवून देणारी संघटना म्हणजे शिवसेना. प्रबोधकारांनी शिवसेनेच्या स्थापनेच्या सभेत शिवाजी पार्कवर हा माझा बाळ मी लोकसेवेसाठी अर्पण करतोय म्हणून सांगितले.एक नवा अध्याय सुरु झाला. मराठी माणसावरहोणाऱ्याअन्यायाविरूद्धबाळासाहेब उभे ठाकले. महाराष्ट्रभर शिवसेनेच्या शाखांची स्थापना झाली. मुंबईतले कामगार, मजूर, गरीब वस्तीत राहाणारे लोक यांच्यावर होणार्या अन्यायाविरोधात शिवसेना उभी राहिली. हा हा म्हणता बाळासाहेबांचे वक्तृत्व आणि नेतृत्व जनमाणसात गारूड करु लागले. महाराष्ट्रातील लाखो तरूण बाळासाहेंबाच्या विचाराने प्रेरीत होऊ लागले.आपल्या आक्रमक नेतृवाने बाळासाहेंबांनी मराठी माणसाला न्याय मिळवून दिला. शिवजयंती उत्सव, गोपाळकाला, गणेशोत्सव, नौरात्रोत्सव अशा सर्वच सामाजिक उत्सवात शिवसेना प्रभावीपणे उभी राहिली. मुंबईत हे उत्सव अंत्यत उत्साहात सुरू झाले. मुंबईत अनेक मिल कामगार तसेच वेगवेगळे उद्योगधंदे होते. या कामगारांच्या अनेक समस्या होत्या त्यांना एकत्रीत आणून शिवसेनेच्या संघटना स्थापन झाल्या. त्यांना पगार, बोनस, कामाचे तास, या सर्वांचे उत्तम नियोजन करून कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम शिवसेनेने केले.

महाराष्ट्र एक दिवस बाळासाहेंबाच्या अधिपत्यात समाविष्ट झाला. प्रबोधनकार ठाकरेंनपासुन सुरू झालेली ही परंपरा बाळासाहेब ठाकरे यांनी पुढे सुरूच ठेवली.

१९८६ साली मुंबईतील चित्रपट सृष्टीवर अरीष्ट कोसळले. तत्कालीन महाराष्ट्र सरकारने चित्रपट निर्मितीवर १७७ टक्के टॅक्स लावला. म्हणजे एक कोटीचा चित्रपट बनविला तर दीड कोटी सरकारला टॅक्स द्यायचा. या जीझीया करामुळे चित्रपट उद्योगाचे कंबरडे मोडले. चित्रपट उद्योग ठप्प झाला. चित्रपट इंडस्ट्रीतील सर्व सुपरस्टार दीलिप कुमार, देवआनंद, धर्मेन्द्र, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, मिथून, गोविंदा, रेखा, श्रीदेवी, हेमा मालिनी सर्व हिरो जमिनीवर उतरले. तरीही काँग्रेस सरकार कर मागे घेईना. अखेरीस मिथून चक्रवर्ती बाळासाहेब ठाकरे यांना भेटला. मिथून ला बाळासाहेब मुलासारखे मानत. तो बाळासाहेबांना म्हणाला, " साहेब सरकारने लावलेला हा कर अंत्यत अन्यायकारक आहे. एवढा कर भरून एकही निर्माता चित्रपट बनवू शकणार नाही. हा उद्योग महाराष्ट्राची शान आहे संस्कृती आहे. आज जर हा उद्योग बंद पडला तर महाराष्ट्राचे फार नुकसान होईल. अनेक पर्यटक महाराष्ट्रात येतात ते कमी होतील. तेव्हा साहेब हा उद्योग महाराष्ट्रात जिवंत रहायला हवा.

या उद्योगात केवळ सुपरस्टार नाहीत तर गोरगरीब आर्टिस्ट्स, मजूर, लाईटमन असे असंख्य लोक आहेत ज्यांचे पोट या उद्योगावर चालते. ते सगळे उपाशी मरतील. तेव्हा साहेब आपण आमच्या पाठीशी उभे रहा. महाराष्ट्रात तुमचाच शब्द अंतिम आहे." त्यांने बाळासाहेबांना साकडे घातले. गरीब मजूर लाईटमन, केमेरामन, असे तळागाळातील कामगार उपाशी मरातायत हे जेव्हा बाळासाहेंबाच्या लक्षात आले तेव्हा बाळासाहेब चित्रपट कलाकारांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी जाहिर केले मी चित्रपट कलाकारांच्या पाठीशी उभा आहे.

परंतु एकदा हा उद्योग बाळासाहेंबाच्या कृपेमुळे उभा राहिला. अखेरीस महाराष्ट्रातील काँग्रेस सरकार झुकले. चित्रपट कलाकारांना बाळासाहेबांनी न्याय मिळवून दिला. प्रबोधनकार ते बाळासाहेब ठाकरे आणि आता राज ठाकरे, उद्धवजी, आदित्य ही परंपरा चालूच आहे. संगीत, फोटोग्राफी, व्यंगचित्रे, या कलेबरोबरच महाराष्ट्राची संस्कृतीचा वारसा जपणारे ठाकरे कुटूंब महाराष्ट्राच्या कलाकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. **

# रसग्रहण

## 'कृष्णगान'

शशिकांत मुद्देबिहाळकर

९७६७१५२६०८

गोरेगावचे एक ज्येष्ठ लेखक, कवी, आणि मुख्य, म्हणजे तमीळ भाषेतील अनेक सुप्रसिद्ध लेखक कवी, यांच्या लेखन, काव्याचे मराठीत अनुवाद करणारे, प्रा.श्री. श्रीप्रकाश अधिकारी यांनी ''कृष्णगान'' हे तमीळ मधील महाकवी सुब्रमणीय भारती यांच्या ''कृष्णन पाट्टू'' या काव्य संग्रहाचे त्यांनी केलेला ''कृष्णगान'' हा अनुवादित कविता संग्रह भेट दिला आणि या कविता संग्रहाचे परिक्षण लिहिण्यास सांगितले. त्यांच्या सारख्या ज्येष्ठ लेखकाच्या कोणत्याही लेखनाचे परिक्षण लिहिण्याची माझी पात्रताच नाही. परंतू त्याच्या आदेशाचा मान राखण्यासाठी या अनुवादित कविता संग्रहातील कवितांचे माझ्या अल्पबुद्धी नुसार फारतर मी रसग्रहण करू शकेन असे मी त्यांना सांगितले. अर्थात माझ्या परीने केलेले हे रसग्रहण असणार. या मधूर आणि अविट गोडीच्या कवितांचा आस्वाद घेण्यासाठीच केवळ. कारण मीच मुळात कवी नाही ते गुण माझ्या अंगी नाहीत. तरी पक्वान्नाने भरलेले ताट समोर वाढले आहे त्यातील, प्रत्येक पदार्थाचा दरवळणारा सुगंध मला मोहित करतोय, त्यासाठीचे हे रसग्रहण अर्थात काव्य रसिकांपर्यंत पोहोचावे म्हणून.



''कृष्णगान'' या कविता संग्रहात एकूण तेरा कविता आहेत. या कवितांमधून त्याच्या अनेक रुपांचे दर्शन होते. कृष्ण बालक म्हणून, खेळगडी म्हणून, मित्र म्हणून, प्रेयसी म्हणून,प्रियकर म्हणून, आई म्हणून, पिता म्हणून, सेवक म्हणून, राजा म्हणून, शिष्य म्हणून, सद्गुरू म्हणून परमात्मा म्हणून, आणि अखेर कुल दैवत म्हणून सुध्दा त्यांच्या दिव्यत्वाचे दर्शन कवी करून देतो. त्याच्या या अनेक रूपांचे दर्शन घडल्यावरही तो मित्र, सवंगडी, म्हणून जास्त लक्षात रहातो. आपण एक एक कवितेचे म्हणजेच त्याच्या एकएक रूपाचे दर्शनाचे रसग्रहण केल्यास त्याच्या त्या अलौकिक रुपाचा आनंदमयी रसास्वाद घेता येईल असे मला वाटते. हा अनुवाद स्वैर नव्हे तर शब्दशः आहे. त्यामुळेच मुळ कवितेचा आशय प्रा.श्री श्रीप्रकाश अधिकारी याच्या अनुवादित कवितेत अनुभवता येतो. हे या काव्य संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. यापुढे दररोज एका रुपाचे म्हणजेच कवितेचे रसग्रहण करीत आहे.

**(कवि. प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)** **

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)